# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 21.02.2011 (का.प.क्रं.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक 21 फेब्रुवारी 2011 (का.प.क्र.12) रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.55 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त, श्री.अजय चारठाणकर, नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स.स.श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.विकास रतनलाल जैन
06. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ.साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
13. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
14. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**चर्चा :**

मा.सभापती :मा.आयुक्त कुठे गेलेले आहे याची सभागृहास माहीती देण्यात यावी.

उपआयुक्त(म) :दिनांक 21फेब्रुवारी ते 1 मार्च बर्मिंगहॅम येथे एका कार्यशाळेसाठी गेलेले आहे.

श्री.मधुकर सावंत :मा.आयुक्तांसोबत कोण कोण गेलेले आहेत.

उपआयुक्त (म) :मा.आयुक्तांसोबत जे गेलेले आहेत त्याबाबतची माझी जी माहिती आहे. त्याप्रमाणे श्री.सिकंदर अली आणि श्रीमती जयश्री कुलकर्णी सोबत गेलेले आहेत.

श्री.मधुकर सावंत :या कार्यशाळेचा महानगरपालिकेस किती फायदा होणार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :दौऱ्यावर किती खर्च येणार आहे याची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :विषय क्रमांक 134 इतिवृत्त कायम करणे बाबत.

श्री.रेणुकादास वैद्य :इतिवृत्त कायम करतांना एक सूचना आहे की, सर्वसाधारण सभेने महानगरपालिकेच्या क्षेत्रात असलेले सभागृह एक हजार रूपये दरमहा व त्याची देखभाल दुरूस्ती संबधीत संस्थेने करावी अशा पध्दतीचा विषय मंजूर केलेला आहे. असे असले तरी महानगरपालिकेचा जास्त आर्थिक फायदा

व्हावा या दृष्टीने या सर्वाचे निवीदा प्रक्रीया करण्यात यावे. उदा. स.सदस्य श्री.मधुकर सावंत यांचे वार्डात 3 सभागृह बांधण्यात आलेले आहे. आजची त्यांची अवस्था बिकट आहे. या ओपन स्पेसमध्ये हॉल बांधलेले आहे त्या नागरीकाला त्याचा फायदा होईल. एक हजार रूपयांच्या ऐवजी दहा हजार रूपये भाडयाने सभागृह घेवुन अवैध धंदे चालू केले तर ते महानगरपालिकेच्या हिताचे असणार नाही. या सर्व गोष्टींचा विचार करून एकदा सर्वसाधारण सभेने पॉलिसी ठरविल्यावर पुन्हा पॉलिसी बदलण्यात येवु नये.

मा.सभापती :स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. महानगरपालिकेने, आमदार खासदार निधीतुन जे हॉल बांधलेले आहे. सोसायटीच्या नागरीकांच्या उपयोगी पडावा त्या ठिकाणी सार्वजनिक हिताचे कार्यक्रम व्हावे यासाठी हॉल बांधलेले आहे. व्यावसायिक दृष्टीने उत्पन्न प्राप्तीच्या दृष्टीने हॉल बांधलेले नाही. सभागृह सध्या आजारी अवस्थेत पडलेले आहे त्यामुळे सर्वसाधारण सभेने स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे. त्यात्या विभागातील चांगल्या कामासाठी सार्वजनिक हिताच्या कार्यक्रमासाठी वापरण्याकरीता एक हजार रूपये प्रतिमहा या दराने देण्यासाठी जी रूलिंग दिली होती ती कायम करण्यात येते. यानंतर सर्वसाधारण सभेने व स्थायी समितीने घेतलेले असा कोणताही ठराव शासनाकडे विखंडीतकरण्याकरीता पाठवु नये. या ठरावामध्ये सर्वसाधारण सभेने व स्थायी समितीने घेतलेला निर्णय कायम ठेवण्यांत येत आहे.

श्री.मधुकर सावंत :5 (2)2 आणि 67 सी च्या कामाच्या चौकशी करीता स्थायी समितीच्या काही सदस्यांना घेवुन चौकशी समिती स्थापन केली होती. 15 दिवसांमध्ये अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले होते. आज साधारणत: एक महिना झालेला आहे. अहवाल अप्राप्त आहे खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

प्र.आयुक्त :शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

तांत्रिक कक्ष प्रमुख : 5 (2)2 आणि 67 (3) सी अंतर्गत प्रकरणाची छाननी चालू आहे. यामध्ये जवळपास 350 संचिका आहे. त्यामध्ये 158 संचिका पुर्ण केलेल्या आहेत. उर्वरीत संचिकांची चार दिवसात छाननी करण्यात येईल. प्राथमिक छाननी चा अहवाल तयार झाल्यानंतर त्याची तपासणीसाठी आणि जागेवर तपासणीसाठी कमिटीमधील स.सदस्यांना विनंती करण्यात येईल.

श्री.विकास जैन :RCH बाबत चौकशी समिती नेमुन अहवाल सादर करण्यास सांगीतले होते परंतु अद्यापपर्यंत काहीच कार्यवाही झालेली नाही. उमेदवारांवर अन्याय झालेला आहे.

मा.सभापती : RCH बाबतचा अहवाल येत्या बैठकीसमोर ठेवण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :इतिवृत्त कायम करत असतांना पान क्रमांक 3 वर मागील बैठकीत व दिनांक 12.01.2011च्या बैठकीत ADTP प्रशासकीय विभाग यांना आदेश देण्यात आले होते. त्याबाबतीत पुढे काय झाले माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ADTP यांनी खुलासा केलेला आहे. बिल्डींग परमिशन बोगस आहे. पत्र देण्यात आलेले आहे. सभागृहास खुलासा केलेला आहे.

सहा.संचालक, (न.र.) :मा.सभापतींनी आदेशीत केल्याप्रमाणे संबधीत पोलीस स्टेशनमध्ये पत्र देण्यांत आले. तसेच पोलीस आयुक्त कार्यालयात गुन्हा दाखल करण्यात यावा म्हणुन पत्र देण्यात आलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :गेल्या 2 वर्षापासून पत्र देण्यात येत आहे. गुन्हा दाखल झाला आहे किंवा नाही.

मा.सभापती :पत्र दिल्यानंतर काही खुलासा आलेला आहे का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार :पत्र दिल्यानंतर काय झाले. कार्यवाही झाली नाहीतर संबधीताविरूध्द काय कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती :सीपी ऑफिसला ADTP यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना पाठवून सदर पत्रावर काय कार्यवाही झाली याबाबत माहिती घेण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ADTP यांनी नियमाप्रमाणे पत्र दिलेले आहे.

मा.सभापती :सभा संपण्यापुर्वी संबधीत कार्यालयाकडुन माहिती घेण्यात यावी.

**विषय क्र. 134 :**

दिनांक 12/01/2011 (का.प.क्र.10) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.सभापती : विषय क्रमांक 134 मंजूर.

**ठराव :**

दिनांक 12/01/2011 (का.प.क्र.10) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. 135 :** (दि. 12/01/2011 रोजीच्या सभेतील स्थगित करण्यात आलेला विषय क्र. 97)

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.गणेश कॉलनी येथील खाजगी मालकीचे मस्जिद व्यवस्थापन कमिटीची (आलमगीर मस्जिद) दोन खोल्या महानगरपालिका वाचनालयाकरीता घेणेसाठी उपआयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी भाडे निश्चित करून देणेसाठी संचिका मालमत्ता विभागास वर्ग केली आहे. त्याअनुषंगाने सदर ठिकाणचे भाडे निश्चित करून भाडे समितीमध्ये मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर ठिकाणच्या दोन खोल्याचे क्षेत्रफळ 55.76 चौ.मी. असून त्याचे सिध्द शिघ्र गणकानुसार रू.103/- प्रमाणे आकारून वाचनालयाकरीता भाड्याने घेणे योग्य. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.विजय वाघचौरे : जे भाडे लावण्यात आलेले आहे त्याबाबत खुलासा करण्यात यावा. रू.103 काय आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : माहिती आलेली आहे, माहिती घेवून विषय मंजूर करण्यात यावा.

उप आयुक्त (सिडको) : प्रति चौरस मीटरचा दर आहे. रेडी रेक्नर प्रमाणे रेट तपासण्यात आलेला आहे.

श्री.विकास जैन : विषय क्रमांक 136 व 135 या दोन्ही विषयांमध्ये रेटचा फरक आहे.

श्री.मधुकर सावंत : शाळेकरीता असल्याने त्या बाबतीत निर्णय घ्यावा.

| | |
|---|---|
| श्री.जगदीश सिध्द | : मनपाकडे जागा नाही काय? खाजगी जागा घेवून भाड्याने घेत आहे. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | : विषय मंजूर करण्यात यावे. |
| श्री.जगदीश सिध्द | : खाजगी जागा घेण्याबाबत प्रशसनाची पॉलीसी ठरलेली आहे काय? |
| मा.सभापती | : खाजगी जागा घेऊन शाळा चालविण्यात आलेल्या आहेत का? |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | : बऱ्याचशा शाळा चालविण्यात येतात. |
| उप आयुक्त (सिडको) | : रेडी रेक्नर प्रमाणे पुट अप करण्यात आलेले आहे. |
| मा.सभापती | : विषय क्रमांक 135 बाबत जो रेडी रेक्नर प्रमाणे जर कमी दर देण्यास तयार असेल तर तसा प्रयत्न करावा. |
| उप आयुक्त (सिडको) | : सदरचा विषय शिक्षण विभागाशी संबंधीत आहे. रेडी रेक्नरचे दर कॅलक्युलेट करून आपणांकडे दिलेले आहे. |
| मा.सभापती | : रेडी रेक्नर प्रमाणे वाटाघाटी करून दर कमी होत असेल तर करण्यात यावे. विषय क्रमांक 135 मंजूर. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.गणेश कॉलनी येथील खाजगी मालकीचे मस्जिद व्यवस्थापन कमिटीची (आलमगीर मस्जिद) दोन खोल्या क्षेत्रफळ 55.76 चौ.मी. असून महानगरपालिका वाचनालयाकरीता सिध्द शिघ्र गणकानुसार रू.103/- प्रमाणे आकारून वाचनालयाकरीता भाड्याने घेणेस मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे दर कमी करण्याबाबत वाटाघाटी करून करावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 136 :** (दि. 12/01/2011 रोजीच्या सभेतील स्थगित करण्यात आलेला विषय क्र.106)

मा.आयुक्त महोदय, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेन्वये उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.विश्रांतीनगर जयभवानीनगर येथील सौ.निर्मला दत्ता काळे यांची इमारत ज्याचे क्षेत्रफळ 85.02 चौ.मी. असून शाळेकरीता भाड्याने घेणे बाबत मा.शिक्षणाधिकारी यांनी या विभागास दि.10/06/2010 रोजी संचिका दर निश्चितीसाठी पाठविण्यात आली असता सदर जागेचे सिध्द शिघ्र गणकानुसार दर रू.215/- प्रती चौ.मी. प्रती महा आकारणे योग्य. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.जगदिश सिध्द | :एक हजार रूपये प्रमाणे भाडयाने देवुन टाकण्यात यावे. मनपाची पॉलिसी स्विकारणेस सांगण्यात यावे. |
| श्री.मधुकर सावंत | :किती वर्षासाठी भाडयाने घेणार आहे. खुलासा करण्यात यावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :मागील बैठकीत स.सदस्य श्री.विजय वाघचौरे यांनी मुद्दा मांडला होता. आजुबाजूचे भाडयाचे दर लक्षात घेवुन महानगरपालिकेने भाडयाने घेतलेले जागांचे दर सांगीतले होते. यास 18000 रूपये भाडे देण्यात येते याचे कारण काय? या इमारतीला महानगरपालिकेची परवानगी आहे काय? अग्निशमन विभागाची एनओसी या शाळेला आहे काय? |
| उपआयुक्त(प्र) | :या संदर्भातील संचिका उपआयुक्त प्रशासनाचा चार्ज घेण्याच्या पुर्वीची आहे. |
| श्री.विकास जैन | :सदरील खुलासा योग्य नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :खुलासा योग्य नाही. |
| श्री.महेश माळवतकर | :भाडयाच्या दराच्या तफावतीबाबत खुलासा करण्यात यावा. गुंठेवारीत नियमीत केलेले आहे काय? |

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | :एका एरीयातील रेडी रेकनर सारखा असायला पाहीजे. भाडे समितीमध्ये सात सदस्य असतांना अशा प्रकारची चुकीची सही कशी करण्यात आली आहे. महानगरपालिकेचा पैसा हा जनतेचा पैसा आहे. |
| उपआयुक्त (सिडको) | :विषय क्रमांक 136 मधील जो रेडीरेकनरचा दर आहे. तो रेडी रेकनरचा दर आणि विषय पत्रिकेवर आलेला दर सन 2010चे रेडी रेकनरचे जे दर ते पडताळुन बघितले आहे ते सारखेच आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :त्याच भागातील रेडी रेकनर महानगरपालिकेने घेतलेले जागांचे रेट पुढील प्रमाणे आहे. गणेश कॉलनी येथे 590 आहे, बेगमपुऱ्यात 2800 आहे. उस्मानपुऱ्यात 790 आहे. पैठणगेट येथे 1600 हनुमाननगर येथे 5000 असे आहे. रू.18000/- दर का देण्यात येत आहे. एवढा फरक का पडतो आहे. |
| उपआयुक्त (सिडको) | :कार्यकारी अभियंता अ यांचे सहीने दर बरोबर आहे असे सांगीतल्यावर दर ठरविण्यात आले आहे. |
| श्री.विजय वाघचौरे | :गुंठेवारीची जागा घेता येते का? याचा विचार केलेला आहे काय? |
| श्री.रेणुकादास वैद्य | :प्रशासनास सदरील विषयाचा खुलासा करता आलेला नाही. कसलाही अभ्यास न करता महानगरपालिकेची लुट करीता हा विषय प्रस्ताव मंजूरीसाठी आलेला आहे. सदर जागेस महानगरपालिकेची परवानगी आहे का याचा खुलासा होण अपेक्षित आहे. |
| मा.सभापती | :जागेवरील बांधकाम कायदेशिररीत्या आहे काय? अग्निशमन विभागाची परवानगी आहे का? भाडयाने शाळेकरीता घेऊ शकतो का? याबाबींचा संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| उपआयुक्त(प्र) | :माहिती घेवुन पुढील बैठकीत सविस्तर खुलासा करण्यात येईल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :मागील बैठकीत सदरील विषयावर चर्चा झालेली आहे. |
| श्री.विकास जैन | :संबधीत अधिकारी यांनी विषयावर पुर्ण अभ्यास करून येणे आवश्यक आहे. |
| श्री.अमित भुईगळ | :अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करायला पाहीजे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :सक्षम अधिकारी खुलासा करण्यास असमर्थ आहे त्यामुळे प्रस्ताव रद्द करण्यात यावा. सदरील प्रस्ताव चुकीच्या पध्दतीने का आला याची चौकशी करण्यात यावी. |
| श्री.विजय वाघचौरे | :मागील बैठकीमध्येही हा प्रस्ताव आलेला होता. चौकशी करण्यात यावी. |
| मा.सभापती | :विषय क्रमांक 136 बाबत संबधीत अधिकारी यांनी समाधानकारक खुलासा न केल्यामुळे विषय स्थगीत ठेवण्यात येतो. प्रशासनास आदेश देण्यात येते की, विषयासंबधी पुर्ण अभ्यास करून संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. विषयाशी संबधीत अधिकारी सभागृहात उपस्थित असले पाहीजे. |

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 137 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.62 अंतर्गत कोटला कॉलनी अंतर्गत म्हाडा कॉलनी येथील खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय र.रू.12,99,962/-

होत आहे. सदरील काम सन 2010-11 च्या अर्थसंकल्पात विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी प्रशासकीय मंजुरी देवून प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यास शिफारस केलेली आहे.

तरी रक्कम रू.12,99,962/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.62 कोटला कॉलनी अंतर्गत म्हाडा कॉलनी येथील खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे या कामाचे तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,99,962/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 138 :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.15 मधील विविध ठिकाणी रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार अं.प. रक्कम रू.14,99,200/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षात शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्षा मधून करण्यांत येईल सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय, यांची मान्यता होऊन मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस केली आहे.

तरी अं.प. रक्कम रू.14,99,200/- चे अं.प. प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.रेणुकादास वैद्य :विषय क्रमांक 143 पर्यंत मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती :मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.15 मधील विविध ठिकाणी रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.14,99,200/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 139 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.75 संजयनगर मुकूंदवाडी येथील मुख्य रस्ता सिमेंट कॉंक्रेटचा करण्याकरीता सा.बां. विभागाचे सन 2008-09 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.19,99,800/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षाअंतर्गत नविन कॉंक्रेट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुदीनुसार करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.19,99,800/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.75 संजयनगर मुकूंदवाडी येथील मुख्य रस्ता सिमेंट कॉंक्रेटचा करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.19,99,800/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 140 :**

कार्यकारी अभियंता, वार्ड ई व फ महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्र.92 अंतर्गत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2008 ते 2009 च्या दरसुचीनुसार सदर कामाचे रक्कम रू.14,72,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू.14,72,000/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.92 अंतर्गत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,72,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 141 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.24 सिडको एन-1 भागात MIDC रस्त्यालगत ग्रीन बेल्ट विकसीत करणे करीता सा.बां. विभागाचे सन 2008-09 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.19,60,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षातंर्गत नविन उद्यान या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुदीनुसार करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.19,60,000/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.24 सिडको एन-1 भागात MIDC रस्त्यालगत ग्रीन बेल्ट विकसीत करणे या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.19,60,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 142 :**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.05 अंतर्गत विविध ठिकाणी पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन 2010-11 ची दरसुची (DSR) नुसार तयार करण्यात आले असून अं.प.र.रू.15 लक्ष आहे. प्रस्तुत कामासाठी अर्थसंकल्प पुस्तीका सन 2010-11 मध्ये पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्ष अंतर्गत पान क्रं.GBR-A1 नुसार 15 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर करणेसाठी मा.आयुक्त महोदयांची दिनांक 18/01/2011 रोजी मान्यता प्राप्त आहे. अंदाजपत्रक र.रू.15,00,000/- चे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.05 अंतर्गत विविध ठिकाणी पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे तयार करण्यांत आलेल्या र.रू.15,00,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 143 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.27 शताब्दीनगर, बाबर कॉलनी, नाहिदनगर, यशोधरा कॉलनी, जिव्हेश्वर कॉलनी, वैशालीनगर येथील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी 300 मीमी व्यासाची डी.आय.के.7 जलवाहिनी टाकावयाचे प्रस्तावित आहे.

वार्ड क्र.27 या भागात कमी व्यासाची लाईन असल्यामूळे, बाबर कॉलनी, नाहीदनगर, यशोधरा कॉलनी, जिव्हेश्वर कॉलनी व वैशालीनगर या भागात कमी दाबाने व काही नळ धारकांना पाणी येत नसल्यामूळे स.नगरसेवक व नागरीक वारंवार तक्रारी करीत आहेत. करीता या भागातील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी 300 मीमी व्यासाची डी.आय.के.7 जलवाहिनी टाकण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुची सन 2009-10 नुसार अंदाजपत्रक र.रूपये 15,00,000/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

करिता वार्ड क्र.27 शताब्दीनगर येथे आझाद चौक ते जिव्हेश्वर कॉलनी पर्यंत 300 मीमी व्यासाची डीआयके 7 जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी अंदाजपत्रक र.रूपये 15,00,000/- चे मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.27 शताब्दीनगर येथे आझाद चौक ते जिव्हेश्वर कॉलनी पर्यंत 300 मीमी व्यासाची डीआयके 7 जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रूपये 15,00,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 144 :**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार शहर स्वच्छता आराखडा तयार करण्यासाठी देशातील 423 नगरांची निवड केली आहे. त्यामध्ये औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश आहे. यासाठी शासनाच्या निर्देशानुसार शहर स्वच्छता आराखडा (City Sanitation Plan) तयार करावयाचा आहे. हा आराखडा तयार करण्यासाठी एक शहर स्वच्छता कार्यबल समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच एका नामांकित व्यक्तिची ज्याच्या शब्दाला शहरात मान आहे - अशा व्यक्तिची शहर स्वच्छता राजदूत म्हणून निवड करावी असे शासनाचे आदेश आहेत.

औरंगाबाद शहराचे शहर स्वच्छता राजदूत म्हणून प्रख्यात अभिनेता श्री.मकरंद अनासपुरे यांचे नांव मा.महापौर यांनी सुचविल्याप्रमाणे श्री.अनासपुरे यांची शहर स्वच्छता राजदूत म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

शहर स्वच्छता आराखडा तयार करण्यासंबंधी शासनाने महापौर, आयुक्त, नगरसेवक, प्रभाग अधिकारी यांच्या विविध स्तरावरील जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. यामध्ये मा.आयुक्त नोडल अधिकारी यांचेकडील जबाबदाऱ्या पैकी शहर स्वच्छता आराखड्यासाठी विविध प्रकारे लोकजागृती करुन नागरिकांचा सहभाग मिळविणे, प्रसारमाध्यमे यांचे मार्फत शहर स्वच्छतेचा संदेश पोहचविणे या जबाबदाऱ्या आहेत.

औरंगाबाद महानगरपालिकेद्वारा स्वच्छता अभियान राबविणेसाठी व जनजागृती करण्याच्या उद्देशाने एक लघुपट तयार करण्याचे प्रयोजन असल्याने सदर लघुपटाची संहीता (Script) ही दि.03/12/2010 रोजी श्री.मकरंद अनासपुरे यांचेकडून प्राप्त झाली असून त्याचे वाचन दि.19/12/2010 रोजी मा.आयुक्त यांचे समोर करण्यात आलेले आहे. सदर लघुपट निर्मितीसाठी श्री.अनासपुरे यांचे स्थानिक प्रतिनिधी Eight Hours Creative Service (श्री किशोर निकम) यांचेकडून दि.20/12/2010 रोजी Quotation प्राप्त झाले असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश होता.

1. 30 to 45 min AMC Documentary
2. Direction

3. Script
4. HD Camera
5. Editing
6. Voice
7. Dubbing
8. Light
9. Artist (Male-Female) व Technicians

सदर लघुपटाचे चित्रिकरण दोन दिवसांत पुर्ण करण्याचे नमूद असून त्यासाठी रु.6,75,000/- इतका खर्च दर्शविलेला असून याव्यतिरीक्त अभिनेते/ तंत्रज्ञ / दिग्दर्शक यांचा प्रवास खर्च निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था यासाठी वेगळा खर्च करावयाचा आहे. सदर अनुषंगिक खर्चासाठी अंदाजे रु.1.00 लक्ष अपेक्षित असून एकत्रित खर्च रु.7,75,000/- इतका अपेक्षित आहे. तत्पुर्वी श्री.मकरंद अनासपुरे यांनी दि. 18/12/2010 रोजीच्या पत्रानुसार कळविले होते की, लघुपट तयार करण्यासाठी त्यांचे स्थानिक प्रतिनिधी Eight Hours Creative Service यांना लघुपट निर्मितीचा आवश्यक तो अनुभव असून त्यांच्याकडे याविषयीचे विशेष कौशल्य व तंत्रज्ञान, कलाकार उपलब्ध आहे. त्यामुळे लघुपट निर्मितीचे काम Eight Hours Creative Service यांचेकडून करून घेतल्यास लघुपट अधिक दर्जेदार तयार होईल.

श्री.अनासपुरे यांनी विनंती केल्यानुसार Eight Hours Creative Service यांचे दरानुसार लघुपट तयार करणेसाठी येणारा खर्च हा रु.50,000/- पेक्षा जास्त असल्याने निविदा काढणे आवश्यक होती. मात्र लघुपट निर्मितीचे काम हे विशेष कौशल्याचे असल्याने व श्री.मकरंद अनासपुरे हे स्वतः लघुपटात काम करणार असल्याने श्री.अनासपुरे यांनी सदरचे चित्रिकरण दि.23 व 24 डिसेंबर 2010 रोजी करण्याची सुचना दिल्यामुळे लघुपट निर्मितीचे काम विनानिविदा करण्यास व अंदाजित खर्च रु.7,75,000/- या एकत्रित रकमेस मा.स्थायी समितीची मान्यता घेण्याच्या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दि.23/12/2010 रोजी Eight Hours Creative Service व आरोग्य वैद्यकीय अधिकारी / घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख यांचेमध्ये करारनामा झाला असून कार्यारंभ आदेश निर्गमित केला आहे.

सदर लघुपटाचे चित्रिकरण हे दि.23/12/2010 व 24/12/2010 या दोन दिवशी शहरात विविध ठिकाणी करण्यात आले आहे.

करिता, स्वच्छता अभियान या विषयावर लघुपट निर्मितीसाठी व अनुषंगिक खर्चासाठीच्या एकत्रित अंदाजे रु.7,75,000/- या रकमेस तसेच लघुपट निर्मिती ही Eight Hours Creative Service, औरंगाबाद यांचेकडून विनानिविदा करुन घेण्यासाठी प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :विषय क्रमांक 144 कार्योत्तर मंजूरीसाठी आलेला आहे. स्वच्छता राजदूत म्हणून प्रख्यात अभिनेता श्री.मकरंद अनासपुरे यांची निवड करण्यात आली आहे. कुठल्याही वार्डामध्ये स्वच्छता झालेली नाही. लघुपट तयार करण्याचे काय उद्देश याचा खुलासा होणे अपेक्षित आहे. विना निवीदा काम केलेले आहे. सर्वसाधारण सभेत निवेदेवरून रणकंदन झालेले आहे.

आरोग्य वैद्य. अधिकारी :केंद्र शासनाच्या निर्देशानुसार शहर स्वच्छता आराखडा तयार करण्यात आला. मा.महापौरांनी औरंगाबाद शहराचे शहर स्वच्छता राजदूत म्हणून अभिनेता श्री.मकरंद अनासपुरे यांची निवड केली. श्री.मकरंद अनासपुरे यांचा वापर करून स्वच्छता विषयी एक चांगले लघुपट तयार करून उपयोग होऊ शकतो. त्यानुसार लघुपट तयार करण्यात आला आहे. लघुपटात

स्वच्छते विषयी सर्व विषय हाताळले गेलेले आहे. सदर लघुपट सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा वार्डामध्ये दाखविण्यात येणार आहे.

श्री.विजय वाघचौरे :विना निवीदा का काढण्यात आली

आरोग्य वैद्य. अधिकारी :श्री.मकरंद अनासपुरे यांनी ज्या तारखा दिल्या त्याप्रमाणे लघुपट तयार करण्यात आला.

श्री.रेणुकादास वैद्य :श्री.मकरंद अनासपुरे हे सुपरस्टार आहे परंतु महानगरपालिकेचे हित महत्वाचे आहे.

आरोग्य अधिकारी :एका नामांकित व्यक्तिची ज्याच्या शब्दाला शहरात मान आहे अश व्यक्त्‍ीची शहर स्वच्छता राजदूत म्हणून निवड करावी असे शासनाचे आदेश होते.

श्री.रेणुकादास वैद्य :रक्कमेबाबत सुचविण्यात आले होते.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी: रक्कमेबाबत सुचविण्यात आलेले नव्हते.

श्री.रेणुकादास वैद्य :7.50 लाख रूपये खर्च करण्यात येत आहे. मराठी लघुपटासाठी शासन अनुदान देत असते. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब असतांना एवढा खर्च होणे योग्य आहे का?

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:जेवढा खर्च देण्यात आला होता तेवढाच देण्यात आला.

श्री.रेणुकादास वैद्य :निवीदा काढली असती तर फायदा झाला असता.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:वेळ नसल्यामुळे निवीदा काढण्यात आली नाही. लघुपट तयार करण्याचे ऐणवेळी ठरले आहे. सुपरस्टार यांचे तारखा मिळण्यात अडचणी होत्या.

श्री.विकास जैन :स्थायी समितीमध्ये विषय येणे महत्वाचे आहे. रेग्युलर इस्टीमेट मंजूर होत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :कुठल्या तरतुदी आधारे करण्यात येणार आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:सिटी सॅनेटेशन प्लॅन मधुन 13 व्या वित्त आयोगातुन निधी खर्च करायला प्रायरोटी दिली आहे.

मा.सभापती :यानंतर विषय विना निवीदा न करता महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बघता शॉर्ट टेंडर ची निवीदा काढुन मंजूरी घेण्यात यावी. विषय क्रमांक 144 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराचे शहर स्वच्छता राजदूत म्हणून प्रख्यात अभिनेता श्री.मकरंद अनासपुरे हे स्वतः लघुपटात अभिनय करणार असल्याने, लघुपट तयार करण्यासाठी त्यांचे स्थानिक प्रतिनिधी Eight Hours Creative Service यांना लघुपट निर्मितीचा आवश्यक तो अनुभव आणि विशेष कौशल्य व तंत्रज्ञान, कलाकार उपलब्ध असल्याचे सूचित केल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेद्वारा स्वच्छता अभियान राबविणेसाठी व जनजागृती करण्याच्या उद्देशाने एक लघुपट तयार करण्यासाठी लागणाऱ्या अनुषंगिक खर्चासाठीच्या एकत्रित अंदाजे रु.7,75,000/- या रकमेस तसेच लघुपट निर्मिती ही Eight Hours Creative Service, औरंगाबाद यांचेकडून विनानिविदा करुन घेण्यासाठी सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 145 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेत नळ कनेक्शन मंजुरीसाठी दाखल करून घेण्यांत येणाऱ्या नळ कनेक्शन फॉर्म सोबत सादर करावयाचा करारनामा रू.20/- च्या

कोर्ट फि स्टॅम्पसह सादर केला जातो. यापूर्वी हा करारनामा रू.20/- चे Bond Paper (मुद्रांक पेपर) वर केला जात असे तथापी रू.20/- चे Bond Paper (मुद्रांक पेपर) शासनाकडूनच छपाई व वितरण बंद झाले आहे. त्यामूळे कोर्ट फि स्टॅम्पसह करारनामा सादर करण्याची तात्पुरती पध्दत सुरू आहे. तथापी शासनाकडून करारनाम्यासह व्यवहार करण्यासाठी रू.100/- चे Bond Paper (मुद्रांक पेपर) चा वापर करणे बाबतचे निर्देश आहेत. तसेच नळ कनेक्शन मिळणेच्या छापील अर्जाची किमंत सध्या रू.50/- एवढी आहे. त्याची किमंत वाढवून रू.100/- करणे योग्य होईल.

करिता नळ कनेक्शन अर्जासोबत करण्यात येणारा करारनामा रू.100/- चे Bond Paper (मुद्रांक पेपर) वर सादर करणे आणि नळ कनेक्शन फॉर्मची किंमत रू.50/- वरून वाढवून रू.100/- प्रति फॉर्म करण्याच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 145,146 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेत नळ कनेक्शन अर्जासोबत करण्यात येणारा करारनामा रू.100/- चे Bond Paper (मुद्रांक पेपर) वर सादर करणे आणि नळ कनेक्शन फॉर्मची किंमत रू.50/- वरून वाढवून रू.100/- प्रति फॉर्म करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 146 :**

कार्यकारी अभियंता, वार्ड ई व फ महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्र.92 कबीरनगर येथील नाल्याची संरक्षित भिंत दुरूस्ती करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2008-2009 च्या दरसुचीनुसार सदर कामाचे रक्कम रू.1499206/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू.1499206/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.92 कबीरनगर येथील नाल्याची संरक्षित भिंत दुरूस्ती करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.1499206/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 147 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एएमटी शहर बस वाहतुक उपक्रम दिनांक 27 सप्टेंबर 2010 पासून बी.ओ.टी. धारक मे.अकोला प्रवासी व मालवाहतुक संस्थेने बंद केल्यामूळे सर्व बसेस, बसथांबे व संस्थेच्या कार्यालयातील साहित्य मनपा प्रशासनाने ताब्यात घेतले आहे.

महानगरपालिकेने अकोला प्रवासी व मालवाहतुक संस्थेशी केलेल्या करारातील अट क्र.-16 नुसार संस्थेने बसथांबे उभारणी व बसथांब्यावरील जाहिरातींचे हक्क मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स औरंगाबाद यांना हस्तांतरीत केले होते. त्यानुसार सर्व बसथांबे मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स यांनी स्वतःच्या भांडवली गुंतवणुकीतून उभे केलेले आहेत. बसथांब्यावरील जाहिरातींच्या हक्काबाबत अकोला संस्था व मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स यांचे दरम्यान दहावर्षे कालावधीसाठी करार झालेला आहे.

मनपा प्रशासनाने बसथांबे ताब्यात घेतल्यानंतर बसथांब्यावरील जाहिरात हक्कापोटी यापूर्वी प्रतिवर्ष अकोला संस्थेस देण्यात येत असलेली रूपये 6.00 लक्ष रक्कम मनपास देण्याची तयारी मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स यांनी पत्राद्वारे कळविली आहे. व वाटाघाटीअंती प्रतिवर्ष रूपये 8.00 लक्ष रक्कम मनपा फंडात जमा करण्यास मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स यांनी संमती दर्शविली आहे. त्यामूळे एएमटी बसथांब्यापासून मनपास उत्पन्न सुरू होण्याच्या दृष्टीने मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स यांचे सोबत खालील अटी शर्तीस अधिन राहुन करार करणे योग्य होईल.

**अटी व शर्ती :**

01. सद्यस्थितीत उभे असलेल्या 48 बसथांब्यावरील जाहिरातीच्या हक्कापोटी मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स यांना प्रतिवर्ष रूपये 8.00 लक्ष रक्कम मनपा फंडात जमा करावी लागेल. सदरील रक्कम प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात भरावी लागेल. विहीत कालावधीत रकमेचा भरणा न केल्यास करार रद्द बातल ठरवून, या कामी नविन एजन्सीची नियुक्ती करण्याचा अधिकार मनपा प्रशासनास राहील.
02. सद्यस्थितीत 48 बसथांब्या व्यतिरिक्त जास्तीचे बसथांबे उभारावयाचे असल्यास, त्यासाठी मनपा प्रशासनाची पूर्व परवानगी घ्यावी लागेल व प्रति बसथांबा प्रति वर्ष रूपये 25000/- रक्कम बसथांब्यावरील जाहिरातीच्या हक्कापोटी मनपा फंडात जमा करावी लागेल.
03. सर्व बसथांब्यांची देखभाल, दुरूस्ती, स्वच्छता, रंगरंगोटी करण्याची जबाबदारी मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स यांची राहील. महानगरपालिका या कामासाठी कोणताही खर्च करणार नाही.
04. सर्व्हीस टॅक्स व इतर सर्व शासकीय करांचा वेळेवर भरणा करण्याची जबाबदारी मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स, यांची राहील.
05. मनपा प्रशासनास काही जनहितार्थ जाहिराती उदा.पल्स पोलीओ वगैरेची प्रसिध्द करावयाची असल्यास त्यासाठी किमान 10 बसथांबे विना मोबदला उपलब्ध करून द्यावे लागतील.
06. सदरील कराराचा कालावधी दहा वर्षे राहील. कराराचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर बसथांब्यांवरील जाहिरातीच्या हक्का बाबत निर्णय घेण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील.
07. करारातील अटी, शर्ती बाबत काही वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त, मनपा औरंगाबाद यांचा निर्णय अंतीम राहील.

उपरोक्त अटी/शर्तीच्या अधिन राहुन मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स, औरंगाबाद यांच्याशी बसथांब्यांवरील जाहीरातीच्या हक्का बाबत करार करण्यासाठी मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद**

मा.सभापती :विषय मंजूर.

श्री.विकास जैन :देण्यास हरकत नाही. मालकी कुणाची आहे. 48 बसस्टॉप कुणाच्या मालकीचे आहे. मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्सचे आहेत प्रशासनाने या बाबतीतचा खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :बसस्टॉप बांधलेले आहे ते AMT संस्था यांचे मालकीचे आहे. त्यांनी बांधलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :संस्थेने बांधलेले आहे परंतु मालकी त्यांची नाही. AMT चा मुळ ॲग्रीमेंट पहाण्यात यावे. बसस्टॉप बांधायचे आहे. डेव्हलप करायचे आहे आणि महानगरपालिकेला हस्तांतरण करायचे आहेत.

शहर अभियंता :10 वर्षानंतर.

श्री.रेणुकादास वैद्य :त्यामुळे महानगरपालिकेच्या मालकीचे आहे.

श्री.जगदिश सिध्द :AMT बाबत काय झाले आहे. बसस्टॉप जप्त केले आहे. AMT ची सर्व मालमत्ता जप्त केलेली आहे.

श्री.विकास जैन :AMT ची जागा जप्त केल्यानंतर कुणाच्या मालकीची झाली आहे.

शहर अभियंता :लिलावाची प्रक्रीया चालु आहे. प्रक्रीया पुर्ण झाल्यावर आपल्या मालकीची होईल.

श्री.विकाज जैन :बसस्टॉपही जप्त केलेले आहे म्हणजे आपल्या मालकीचे होईल.

शहर अभियंता :होय. सभागृहास माझी दुसरी विनंती की, प्रस्तावात अटी व शर्तीच्या क्रमांक 6 वर सुधारणा करण्यात यावी. करारावर 10 वर्षांचा कालावधी लिहीला गेलेला आहे तो 05 वर्षांचा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :रक्कम वाढवुन घेतली. आता जो ठराव आणलेला आहे त्यात अजुन थोडी वाढ झाली पाहीजे. सहा ते आठ केलेले आहे आमची प्रशासनास अशी विनंती आहे आठ पैक्षा जास्त वाढ व्हावी. परत एकदा Negotiation करावे. 10 लाखापर्यंत अपेक्षा आहे.

मा.सभापती :महानगरपालिकेचा आर्थिक फायदा जर होत असेल तर परत एकदा वाटाघाटी कराव्यात. प्रत्येक वर्षी 10 टक्के वाढ ठेवावी.

शहर अभियंता :प्रत्येक वर्षी 10 टक्के वाढ केल्यास तशी कार्यवाही केली जाईल.

श्री.विकास जैन :एक वर्षाचे आगाऊ भाडे घेण्यात यावे. मालमत्तेचा कुठलाही विषय असेल तर त्यास एक वर्षाचे आगाऊ भाडे आकारण्यात यावे.

मा.सभापती :एक वर्षाचे आगाऊ भाडे घेवुन विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहरातील बसथांब्यावरील जाहिरात हक्कापोटी यापूर्वी प्रतिवर्ष अकोला संस्थेस देण्यात येत असलेली रक्कम रूपये 6.00 लक्ष ऐवजी वाटाघाटीअंती प्रतिवर्ष रूपये 8.00 लक्ष रक्कम मनपा फंडात जमा करण्यास मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स यांनी संमती दर्शविल्याप्रमाणे, मे.अभिषेक ॲडव्हरटायझर्स यांच्याशी प्रस्तावातील अट क्र.6 मध्ये कराराचा कालावधी दहा वर्षे ऐवजी 5 वर्ष राहिल व प्रत्येक वर्षी 10% वाढ करण्याच्या दुरूस्तीसह प्रस्तावातील अटी-शर्तीस अधिन राहुन बसथांब्यांवरील जाहीरातीच्या हक्काबाबत करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

त्याचप्रमाणे एक वर्षाची आगाऊ रक्कम भरणा करून घ्यावी असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 148 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेन्वये उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या पैठणगेट येथील वाहनतळ शुल्क वसुली ठेका पध्दतीने सन 2010-11 करिता देण्यासाठी दि.10/06/2010, 21/09/2010,05/10/2010 व 07/12/2010 अन्वये चार वेळेस प्रसिध्दी देण्यात आली होती. परंतु त्यास कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामूळे संबंधीत प्रभागातील स.नगरसेवक यांनी त्यांच्या प्रभागातील श्री.दिपक सुखनंद मुंडले यांनी अर्ज दिल्यानुसार ते रक्कम रू.8500/- प्रती माह वाहनतळ वसूली करण्यास तयार असल्याचे कळविले होते.

त्यानुसार संबंधीतास वाटाघाटीस बोलाविले असता त्यांनी रू.8500/- वरून रू.10,500/- वाहनतळ शुल्कापोटी प्रती माह देण्याची तयारी दर्शविली आहे.

करिता पैठणगेट येथील वाहनतळ शुल्क वसूलीसाठी दि.01/01/2011 ते 31/03/2011 पर्यंत देण्यासाठीच्या कार्योत्तर मान्यतेस्तव व सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ सविनय सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | :विषय क्रमांक 148 नगर सेवकाने सुचविल्यानुसार प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. खुलासा करण्यात यावा. |
| श्री.विकास जैन | : नगरसेवका सुचवित असेल परंतु नगरसेवकाचे नांव प्रस्तावात येवु नये. |
| मालमत्ता अधिकारी | :स.नगरसेवकांची स्वतःजातीने लक्ष देऊन विषयाची निकड मा.आयुक्तांना लक्षात करुन दिली होती. आपण जी सूचना केली आहे. ती संयुक्तीक आहे यापुढे काळजी घेण्यात येईल. |
| श्री.विकास जैन | :नांव टाकण्यात येवु नये. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :नगरसेवकाचे नांव वगळुन मंजूर करण्यात यावे. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :नांव वगळुन मंजूर करण्यात यावे. |
| श्री.विकास जैन | :ॲडव्हान्स घेण्यात यावे. |
| मा.सभापती | : मालमत्ता भाडे संदर्भातील कोणत्याही प्रस्तावास एक वर्षाचे आगाऊ भाडे घेण्यात यावे. विषय मंजूर करण्यात येतो. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणगेट येथील वाहनतळ शुल्क वसुली ठेका पध्दतीने सन 2010-11 करिता देण्यासाठी श्री.दिपक सुखनंद मुंडले याचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे रू.10,500/- प्रती माह प्रमाणे वाहनतळ शुल्क वसूलीसाठी दि.01/01/2011 ते 31/03/2011 पर्यंत देण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 149 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेन्वये उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या डॉ.सलिम अली सरोवर उद्यान प्रवेश शुल्क व वाहनतळ शुल्क वसूली ठेका पध्दतीने सन 2010-11 करीता देण्यासाठी प्रथम जा.क्र./मनपा/मामअ/1145/2010, दि.29/05/2010 अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सदर निविदा प्रसिध्द झाल्यापासून एकही निविदा प्राप्त न झाल्यामूळे पुन्हा दुसऱ्यावेळी जा.क्र./मनपा/मामअ/1648/ 2010, दि.18/08/2010 अन्वये प्रसिध्दी देण्यात आली होती. त्यावेळेस निविदा मागविण्यात आली असता त्यापैकी सर्वात जास्त रक्कमेची रू.15,551/- प्रती माह श्री.जवाहरलाल खरे यांची निविदा प्राप्त झाली आहे.

सन 2009-2010 मध्ये सदर वाहनतळाचा ठेका रू.11,000/- मध्ये देण्यात आला होता. महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्यादृष्टीने प्रशासनाने वाहनतळाच्या ठेक्याची अपेक्षित रक्कम दुप्पट करण्यात आली होती. परंतु त्यास प्रतिसाद मिळालेला नाही. प्रशासकीय मान्यतेन्वये श्री.खरे यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी प्रती माह रक्कम रू.16,051/- मध्ये ठेका घेणे बाबत लेखी संमती दर्शविली आहे.

करिता, श्री.जवाहरलाल खरे यांना सदर ठिकाणचा वाहनतळाचा ठेका जानेवारी 2011 ते मार्च 2011 पर्यंत देण्यासाठीच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ सविनय सादर.

मा.सभापती : एक वर्षाचे आगाउ भाडे घेण्यात यावे. विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या डॉ.सलिम अली सरोवर उद्यान प्रवेश शुल्क व वाहनतळ शुल्क वसूली ठेका पध्दतीने सन 2010-11 करीता देण्यासाठी प्राप्त झालेल्या जास्त दराचे निविदाधारक श्री.जवाहरलाल खरे यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर ठिकाणचा वाहनतळाचा ठेका जानेवारी 2011 ते मार्च 2011 पर्यंत प्रती माह रक्कम रू.16,051/- मध्ये देण्यासाठी कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 150 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला शहागंज भाजीमंडी मच्छी मार्केटच्या बाजूस असलेली 09 व्यक्तींना विविध व्यवसायासाठी दुकाने भाडे तत्वावर देण्यात आली होती. परंतु दिनांक 16/06/2008 रोजी महानगरपालिकेतर्फे सदरील दुकाने निष्काशीत करण्यात आली असता दि.21/10/2008 रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.124 नुसार संबंधीतास सदरील ठिकाणी 11x9.6 चौ.फुट (9.81 चौ.मी.) या आकाराच्या जागा भाडेपट्ट्यावर देण्यासाठी अशासकीय प्रस्ताव पारीत झालेला असून त्यास मा.आयुक्त यांनी संबंधीतास एका वर्षासाठी जागा भाडे तत्वावर देण्याकरीता दि.15/02/2010 रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे 09 व्यक्तींना प्रत्येक 9.81 चौ.मी. जागेसाठी रू.123/- प्रती चौ.मी. प्रती महा आकारून भाडे पट्ट्याने देणे योग्य.

01. श्री.मनोहर राधाकिसन क्षिरसागर
02. श्री.करीम खान भिकन खान
03. श्री.मोहमंद अय्युब मोहमंद इब्राहिम
04. श्री.अ.शकील अ.कदरी सिद्दीकी
05. श्री.शेख हमीद शेख समद
06. श्री.अब्दुल वाहेद अब्दुल हक
07. श्री.अन्वर खान अब्बास खान
08. श्री.अदील खान अब्बास खान
09. श्री.अब्बास खान वाहेद खान

मान्यता मिळाल्यास मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषीक कर व इतर संलग्न करासह प्रथम एक वर्षासाठी भाड्याने देणे योग्य.

करीता, प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी :महानगरपालिकेच्या शहागंज येथील मच्छीमार्केटमध्ये 9 व्यक्तींना विवीध ठिकाणी दुकाने देण्यात आली होती ती 16.06.2008 रोजी निष्कासीत करण्यात आली.

श्री.विजय वाघचौरे :कारण काय होते.
मालमत्ता अधिकारी :सन 2008 चे प्रकरण आहे संचिकेत तसा काही उल्लेख नाही.
मा.सभापती :विषय क्रमांक 150 रद्द करण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरचा प्रस्ताव रद्द करण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 151 :**

कार्यकारी अभियंता, (ई व फ), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.83 येथील पुंडलिकनगर गल्ली क्र.11 पर्यंत मुख्य नाल्याची दुरूस्ती करणे व पुल बांधुन स्लॅब टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम/ दरसुची सन 2008-09 नुसार रक्कम रूपये 16,98,700/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदर कामास मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता आहे. सदरील कामाचा खर्च नाला ट्रेनिंग कामे सन 2010-2011 मधून प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता एकूण एक निविदा दर भरून प्राप्त झाली असून प्राप्त निविदा उघडली आली असता त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

1) मे.मोना कंस्ट्रक्शन 3.99% कमी दराने

वरीलप्रमाणे प्राप्त निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.99% कमी दराची मे.मोना कंस्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.मोना कंस्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.99 % कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.83 येथील पुंडलिकनगर गल्ली क्र.11 पर्यंत मुख्य नाल्याची दुरूस्ती करणे व पुल बांधुन स्लॅब टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या तुलनात्मकदृष्ट्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.99% कमी दराची मे.मोना कंस्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 152 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्र.क्र.63 दि.02/07/2010 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणवाडी, केसरसिंगपुरा भागातील गटारीची दुरूस्ती करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./ सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार र.रू.15,00,000/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकास प्राप्त मंजुरीअंती निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 1 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत 1 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. मे.शेख कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.70% कमी दराने

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.शेख कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.70% कमी दराची आहे. सदरील निविदेस मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.शेख कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.70% कमी दराच्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्र.क्र.63 दि.02/07/2010 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणवाडी, केसरसिंगपुरा भागातील गटारीची दुरूस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या तुलनात्मकदृष्ट्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.70% कमी दराची मे.शेख कंस्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 153 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, टाऊन हॉल इमारत परिसरातील विद्युत डि.पी. व फोरपोल स्ट्रक्चर शिफ्ट करण्यासाठीचे अंदाजपत्रक सन 2006-07 सा.बां. विभागाच्या दरसुची नुसार रक्कम रू.7,23,851/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली. सदर कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने मे सत्यम वायर्स यांची निविदा असून सदर निविदा मान्य करण्यांत येवून मे.सत्यम वायर्स यांच्याकडून सदरचे काम सुरू करण्यांत आलेले आहे.

महानगरपालिकेच्या इआरपी संगणक विभाग व विविध अधिकारी / पदाधिकारी दालनात बसविण्यांत आलेल्या एअर कंडिशनमुळे विद्युत भारमध्ये वाढ होत असल्याने पॅनल बोर्ड व मेन स्वीचचे नुतणीकरण करणे आवश्यक असल्याने सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.4,83,750/- एवढ्याने वाढ होत आहे. त्यामूळे सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.12,07,601/- एवढ्याचे होते.

करीता वाढीव कामाच्या अंदाजपत्रकास तसेच ह्या कामाचे ठेकेदार मे.सत्यम वायर्स यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरानुसार काम करून घेण्याच्या कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.विजय वाघचौरे :खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :कार्योत्तर मंजूरीसाठी विषय आलेला आहे.

शहर अभियंता :मुळ प्रस्तावात 4 लाख 83 हजार वाढल्याने 10 लाखाच्या वर कॉस्ट वाढल्याने आलेला आहे. मुळ काम 7 लाख 23 हजारांचे होते. काम पुर्ण झालेले आहे. डिपी बसवली आहे. विविध बिल्डींगमध्ये अतिरीक्त बसविण्यत आली.

श्री.रेणुकादास वैद्य :मुख्य लेखापरिक्षक यांनी एसी वापरण्यास सांगीतलेले नाही.

श्री.विकास जैन :एसी बंद करा म्हणून चिफ ऑडिटर यांनी सांगीतलेले आहे.

शहर अभियंता :भविष्यात करणे आवश्यक होते.

श्री.रेणुकादास वैद्य :कार्योत्तर मंजूरी कशासाठी घेण्यात येत आहे.

शहर अभियंता :काम पुर्ण झालेले आहे.

मा.सभापती :विषय क्रमांक 153 स्थगित करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 154 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्र.क्र.63 कोकणवाडी ते क्रांतीनगर रस्त्यावरील पुलाचे बांधकाम करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2010-11 च्या

दरसुचीनुसार र.रू.19,65,431/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकास प्राप्त मंजुरीअंती निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 2 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. श्री.रमेश बाळकृष्ण रूडसमुद्र अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.21% जास्त दराने
2. श्री.एस.एम.इब्राहीम तांत्रिकदृष्ट्या बाद.

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.रमेश बाळकृष्ण रूडसमुद्र यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.21% जास्त दराने आहे. सदरील निविदेस मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी श्री.रमेश बाळकृष्ण रूडसमुद्र यांची अं.प.दरापेक्षा 14.21% जास्त दराच्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :आमच्या वार्डातील वर्क ऑर्डर होऊन दोन ते तिन महिने झालेले आहे. परंतु कंत्राटदार 2 टक्के रक्कम भरत नाही म्हणून उत्तरे मिळत आहे. सदर कंत्राटदार 2 टक्के रक्कम भरत नसेल तर सेकंड लोएस्ट कंत्राटदारास काम देण्यात यावे. अधिकारी जाणीवपूर्वक त्यांच्या पाठीमागे आहेत. कंत्राटदार मनमानी करत असतील तर दुसऱ्या क्रमांकाच्या कंत्राटदारास काम देण्यात यावे.

श्री.विकास जैन :नियमाप्रमाणे 2 टक्के भरले पाहिजे.

श्री.महेश माळवतकर :माझ्या वार्डातील काम 15 टक्के बिलो ने झालेले आहे. परंतु कुठल्याही प्रकारची हालचाल झालेली नाही. वर्कऑर्डर झालेली कामे केव्हा सुरू होणार आहे. खुलासा केला पाहिजे.

मा.सभापती :निवीदेचे काम मंजूर होऊनही काम सुरू न केल्यामुळे दुसऱ्या क्रमांकाच्या गुत्तेदारास (Second Lowest) काम देण्यात यावे. तसेच निवीदा मंजूर होऊनही काम न केलेल्या कामांची यादी देण्यांत यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :मागच्यावेळी डी.अजीतसिंग यांनी माझ्या वार्डातील काम गेल्या 18 महिन्यांपासून चालू आहे व ते अतिशय निकृष्ट दर्जाचे काम आहे. प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. दखल घेतली जात नाही. सक्षम अधिकाऱ्यामार्फत तपासणी करावी. तोपर्यंत बील देवू नये.

श्री.महेश माळवतकर :वर्क ऑर्डर झालेले आहे. वार्डातील नाल्याचे तीन टेंडर झालेले आहे. परंतु काम सुरू होत नाही. दरवर्षी पावसाळयात नागरीकांना त्रास सोसावा लागत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून काम बंद आहे. खुलासा करण्यात यावे.

श्री.विकास जैन :जे रिकॉल झालेले आहे अशा टेंडरची यादी मागविण्यात यावी. टेंडर पब्लीश होत आहे परंतु कुणीही गुत्तेदार येत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :निवीदा मागविण्यासाठी किती खर्च झाला याबाबतची माहिती मागविण्यात यावी.

श्री.विजय वाघचौरे :रेल्वेस्टेशन ते बाबा पेट्रोलपंप रस्त्याचे संथगतीने वेगात चालू आहे. कोकणवाडी मार्फत ट्रॅफिक सोडलेली आहे. त्या ठिकाणी एका मुलाचा मृत्युही झालेला आहे. रस्त्याच्या कामास गती देण्यात यावी.

मा.सभापती :स.सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले त्यानुसार निवीदेचे काम मंजूर होऊनही काम सुरू न केल्यामुळे दुसऱ्या क्रमांकाच्या गुत्तेदारास (Second Lowest) काम देण्यात यावे. तसेच निवीदा मंजूर होऊनही काम न केलेल्या कामांची यादी सादर करण्यात यावी. गुत्तेदार काम योग्य करीत नसेल तर त्याचे देयक देण्यात येऊ नये. स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांचे वार्डातील कामाची तपासणी करून योग्य काम झालेले नसल्यास ठेकेदारास देयक देण्यात येऊ नये. विषय क्रमांक 154,155 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्र.क्र.63 कोकणवाडी ते क्रांतीनगर रस्त्यावरील पुलाचे बांधकाम करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.21% जास्त दराची श्री.रमेश बाळकृष्ण रूडसमुद्र यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 155 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.62 अंतर्गत कोटला कॉलनी येथे विविध रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.9,97,200/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 34.11% जास्त दराने |
| 02. | मे.राजेश्वर कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 46.12% जास्त दराने |
| 03. | मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 47.00% जास्त दराने |
| 04. | श्री.एम.ए.सिद्दीकी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 47.13% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 34.11% जास्त दराची होती. सदर प्राप्त दराच्या निविदेतील दराची सा.बां. विभागाच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तुलना केली असता 24.37% जास्त एवढे दर येत आहे. परंतु सदर निविदा 21.00% जास्त दराने मंजूर करण्याची शिफारस करण्यात आली असता मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे. उक्त मंजूर निविदा दरामुळे सदर कामावर अंदाजपत्रकीय र.रू.9,97,200/- पेक्षा र.रू.2,46,028/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे.

तरी मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.00% जास्त दराची निविदा एकूण र.रू.12,43,228/- च्या खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.62 अंतर्गत कोटला कॉलनी येथे विविध रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.00% जास्त दराच्या निविदेस र.रू.12,43,228/-च्या खर्चासह स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 156 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.63 अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणाचे कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.14,67,700/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01. | श्री.के.बी.पाथ्रीकर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 37.21% जास्त दराने |
| 02. | श्री.एम.ए.सिद्दीकी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 42.86% जास्त दराने |
| 03. | राजेश्वर कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 45.50% जास्त दराने |
| 04. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 46.00% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.के.बी.पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 37.21% जास्त दराची होती. सदर प्राप्त दराच्या निविदेतील दराची सा.बां. विभागाच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तुलना केली असता मुळ अंदाजपत्रकाच्या 18.73% जास्त एवढे दर येत आहे. ज्यामूळे सदर कामावर अंदाजपत्रकीय र.रू.14,69,685/- पेक्षा र.रू.2,75,380/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे. यास मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी श्री.के.बी.पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.73% जास्त दराची निविदा एकूण र.रू.17,45,065/- च्या खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.63 अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.के. बी. पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.73% जास्त दराच्या निविदेस र.रू.17,45,065/- च्या खर्चासह स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 157 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.61 समर्थनगर (दक्षिण) येथे श्रीराम मंदिर ते गोदावरी बँक पर्यंत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.9,49,500/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01. | श्री.के.बी.पाथ्रीकर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 42.00% जास्त दराने |
| 02. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 43.59% जास्त दराने |
| 03. | मे.मॉस्कट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 46.00% जास्त दराने |
| 04. | श्री.एम.ए.सिद्दीकी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 48.00% जास्त दराने |
| 05. | मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 49.99% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमीदराची निविदा श्री.के.बी.पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 42.00% जास्त दराची होती. सदर प्राप्त दराच्या निविदेतील दराची सा.बां. विभागाच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तुलना केली असता 23.41% जास्त एवढे दर येत आहे. परंतु सदर निविदा 20.00% जास्त दराने मंजुर करण्याची शिफारस करण्यात आली असता मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे, उक्त मंजुर निविदा दरामुळे सदर कामावर अंदाजपत्रकीय र.रू.9,49,500/- पेक्षा र.रू.2,22,352/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री.के.बी.पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.00% जास्त दराची निविदा एकूण र.रू.11,71,852/- च्या खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.61 समर्थनगर (दक्षिण) येथे श्रीराम मंदिर ते गोदावरी बँक पर्यंत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.के.बी.पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.00% जास्त दराच्या निविदेस र.रू.11,71,852/- च्या खर्चासह स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 158 :**

मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक आणि पर्यटन दृष्टया महत्वाचे शहर असून हे शहर मराठवाड्याची राजधानी आहे. या शहरात औद्योगिक प्रकल्प मोठया प्रमाणात आहेत त्याच प्रमाणे मोठमोठे औद्योगिक प्रकल्प या शहरात येत आहेत. अनेक शैक्षणिक संस्था आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे या शहराचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. शैक्षणिक, औद्योगीक, सांस्कृतिक, वैद्यकीय सेवा सुविधा आणि पर्यटन स्थळांमुळे या शहराची झपाट्याने वाढ होत चालली असून आजुबाजूचे जिल्हे/परिसरातुन मोठ्या प्रमाणात लोक या शहरात स्थलांतरीत होत आहेत परिणामी नवनविन वसाहती उदयास येत आहेत.

सबब या शहरासाठी सध्या अस्तित्वात असलेली पाणी पुरवठा योजना ही अत्यंत कमी पडत असून नागरिकांना पुरेशा प्रमाणात महानगरपालिका पाणी पुरवठा करु शकत नाही. तसेच सध्या नव्याने विकसित झालेल्या वसाहती आणि पुढील किमान ३० वर्षात (वर्ष २०४१ पर्यंत) अस्तित्वात येणाऱ्या नविन वसाहती यांचेकरीता या शहरासाठी नविन वाढीव पाणी पुरवठा योजनेचे नियोजन करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे या शहराचा दर्जा उंचावण्यासाठी औरंगाबाद शहराची पाणी पुरवठा व्यवस्था सुधारण्याचे नियोजन प्राधान्याने हाती घेतले आहे. सध्या शहराचे दरडोई पाणी परिमाण प्रति व्यक्ती प्रति दिन ८० ते १०० लि. असे आहे. Central Public Health & Environmental Engineering Organization (CPHEEO) मानकानुसार हे प्रमाण १३५ लि.प्रति व्यक्ती प्रति दिन असणे आवश्यक आहे. औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत १०.०० द.ल.ली. प्रति दिन क्षमतेची (हर्सूल) पाणी पुरवठा योजना, ५६.०० द.ल.ली. प्रति दिन क्षमतेची (जायकवाडी) जुनी पाणी पुरवठा योजना व १०० द.ल.ली. प्रति दिन क्षमतेची (जायकवाडी) नविन पाणी पुरवठा योजना या तिन योजना अनुक्रमे सन १९५४, सन १९७५-७६ व सन १९९२ साली राबविण्यात आलेल्या आहेत.

जायकवाडी जलाशयातुन पाणी उपसा होत असलेल्या दोन्ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने ०१ एप्रिल १९९८ रोजी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या आहेत. त्यामुळे १९९८ पासून या योजनांची देखभाल-दुरुस्ती व संचलनाचे काम महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. या दोन्हीही

योजनांद्वारे प्राप्त होणारे एकूण निव्वळ पाणी परिमाण १२२ ते १२४ द.ल.ली. प्रति दिन इतके आहे. शहराची आजची लोकसंख्या अंदाजे ११.५० लक्ष असून, रस्त्यातील ग्राहक व वितरण व्यय वजा जाता शहरास निव्वळ पाणी परिमाण १८० द.ल.ली. प्रति दिन प्राप्त होणे गरजेचे आहे. तोकडे पाणी परिमाण व वितरण व्यवस्थेमधील त्रुटी यांमुळे सन २००१ पासुन शहरास एक दिवसाआड पाणी पुरवठा करावा लागत आहे. सबब उपरोक्त कारणांमुळे महानगरपालिकेने समांतर पाणी पुरवठा योजनेचे नियोजन हाती घेतलेले आहे.

## समांतर पाणी पुरवठा योजना

औरंगाबाद महानगरपालिकेने शहराच्या वाढीव पाणीपुरवठ्यासाठी सन २००५-०६ मध्ये समांतर जलवाहिनी योजनेचे नियोजन व संकल्पन केले. केंद्र शासनाच्या Urban Infrastructure Development Scheme for Small & Medium Towns (UIDSSMT) या योजनेतुन अनुदान मिळण्यासाठी महानगरपालिकेने रुपये ३५९.६७ कोटीचा प्रस्ताव सन २००६ मध्ये शासनास सादर केला होता. मा. संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २०.०६.२००९ रोजी पत्र देऊन केंद्रशासन पुरस्कृत UIDSSMT योजने अंतर्गत औरंगाबाद शहर समांतर पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावाला मंजुरी प्राप्त झाल्याचे महानगरपालिकेस कळविले. महानगरपालिकेने समांतर पाणीपुरवठा योजनेचा रुपये ३५९.६७ कोटीचा प्रस्ताव UIDSSMT योजने अंतर्गत शासनाकडे सादर केला तेव्हा प्रकल्पाची एकुण किंमत काढण्यासाठी सन २००५-०६ ची तत्कालीन दरसुची वापरण्यात आली होती. या प्रस्तावास / योजनेस मंजुरी मिळणे करीता सन २००६ पासुन ते वर्ष २००९ साधारणत: ३ वर्षांचा कालावधी लागला.

योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी तांत्रिक मुल्यांकन केले असून प्रकल्पाची सन २००८-०९ दरसुचीनुसार एकुण किंमत अंदाजे रक्कम रुपये ५११.३१ कोटी इतकी येते. सदरची कार्यवाही प्रकल्पाच्या वाढीव रकमेच्या ५०% रक्कम राज्य शासनाकडुन पुरक अनुदान मिळण्यासाठी करण्यात आली.

मंजुर झालेल्या मुळ रक्कम रुपये ३५९.६७ कोटीच्या प्रस्तावामध्ये शहरातील भागश: वितरण व्यवस्थे करीता ढोबळ मानाने तरतुद ठेवण्यात आली होती. तथापि आज रोजी संपुर्ण पाणी पुरवठा योजनेचे काम Public Private Partnership (PPP) तत्वावर करण्यात येत असल्याने व पुढील २० वर्षे योजनेचे संचलन व देखभाल दुरुस्ती (Operation & Maintenance) हे विकासक (Concessionaire) करणार असल्याने मंजुर प्रस्तावानुसार शहरातील भागश: वितरण व्यवस्थेच्या कामांऐवजी संपुर्ण वितरण व्यवथेची कामे करणे आवश्यक असल्याने त्यानुसार PPP Model अंतर्गत वितरण व्यवस्थेची कामे प्रस्तावीत करण्यात आली आहेत.

## योजनेचा आर्थिक आकृतीबंध

| **UIDSSMT योजने अंतर्गत मंजुर योजना** | | |
|---|---|---|
| – केंद्र शासन अनुदान (८०%) | :- | रु. २८७.७४ कोटी |
| – राज्य शासन अनुदान (१०%) | :- | रु. ३५.९७ कोटी |
| – महानगरपालिकेचा सहभाग (१०%) | :- | रु. ३५.९७ कोटी |
| | | **एकुण रु. ३५९.६७ कोटी** |

| अ.क्र. | अंतर्भुत कामे | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| **अ** | **जलवहन व्यवस्था (Transmission System)** | |
| १ | सर्वेक्षण व उद्भव | रु. ५६९.५७ लक्ष |
| २ | अशुध्द जल पंपींग मशिनरी | रु. ५८५.५२ लक्ष |
| ३ | अशुध्द जल उद्धरण वाहिनी (लांबी -२७ किमी.)<br>(पोलादी २२०० मि.मी. व्यास, १४ मि.मी. जाडी) | रु. १४६५७.३१ लक्ष |
| ४ | जलशुध्दीकरण केंद्र<br>(टप्पा -१, क्षमता १९० द.ल.ली.) | रु. ११६७.१० लक्ष |
| ५ | शुध्द जल पंपींग मशिनरी | रु. ७४१.३१ लक्ष |
| ६ | शुध्द जल उद्धरण वाहिनी (लांबी -१२.१२ किमी.)<br>(पोलादी २२०० मि.मी. व्यास, १८ मि.मी. जाडी) | रु. ७६१०.४९ लक्ष |
| ७ | संतुलीत जलकुंभ | --- |
| ८ | कर्मचारी निवासस्थाने व इतर | --- |
| | **एकुण अ** | **रु. २५३३१.३० लक्ष** |
| | | **रु. २५३.३१ कोटी** |
| **ब** | **वितरण व्यवस्था** | |
| ९ | शुध्द जल गुरुत्व वाहिनी व वितरण प्रणाली | |
| | (i) शुध्द जल गुरुत्व वाहिनी | रु. ३०५८.१८ लक्ष |
| | (ii) वितरण प्रणाली, लांबी ४५५ कि.मी. | रु.७५८४.१० लक्ष |
| | **एकुण ब** | **रु. १०६३६.१८ लक्ष** |
| | | **रु. १०६.३६ कोटी** |
| | **एकुण अ+ब** | **रु. ३५९.६७ कोटी** |

| | **PPP अंतर्गत प्रस्तावीत योजना** | |
|---|---|---|
| अ.क्र. | अंतर्भुत कामे | अंदाजपत्रकीय रक्कम |
| अ | **जलवहन व्यवस्था (Transmission System)** | |
| १ | सर्वेक्षण व उद्भव | रु. ९०८.९१ लक्ष |
| २ | अशुध्द जल पंपींग मशिनरी | रु. ८६८.५६ लक्ष |
| ३ | अशुध्द जल उद्धरण वाहिनी (लांबी - २७ किमी.)<br>(पोलादी २००० मि.मी. व्यास, १६ मि.मी. जाडी) | रु. १९३६४.४० लक्ष |
| ४ | जलशुध्दीकरण केंद्र<br>(टप्पा -१, क्षमता १९२ द.ल.ली.) | रु. १४६१.१४ लक्ष |
| ५ | शुध्द जल पंपींग मशिनरी | रु. १२५०.२२ लक्ष |
| ६ | शुध्द जल उद्धरण वाहिनी (लांबी - १२.१६ किमी.)<br>(पोलादी २००० मि.मी. व्यास, २० मि.मी. जाडी) | रु. १०३३८.०५ लक्ष |
| ७ | संतुलीत जलकुंभ (क्षमता १० द.ल.ली.) | रु. २७९.२८ लक्ष |
| ८ | कर्मचारी निवासस्थाने व इतर | रु. १५१.४१ लक्ष |
| | **एकुण अ** | **रु. ३४६२१.९६ लक्ष** |
| | | **रु. ३४६.२२ कोटी** |

| | | |
|---|---|---|
| **ब** | **वितरण व्यवस्था** | |
| | मुख्य जलवाहिन्या (Trunk & Feeder Mains) | **रु. ६९.१७ कोटी** |
| **क** | **वितरण व्यवस्था लांबी १२८९ कि.मी. + ११ जलकुंभ** | **रु. ३२०.१८ कोटी** |
| **ड** | **जलमापक यंत्र बसविणे** | **रु. ५६.६३ कोटी** |
| | **एकुण अ+ब+क+ड** | **रु. ७९२.२० कोटी** |

| | | |
|---|---|---|
| • महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दरसुची सन २००८-०९ नुसार केलेल्या तांत्रिक मुल्यांकनानुसार प्रकल्पाची येणारी किंमत. | :- | रु.५११.३१ कोटी |
| • पी.पी.पी. तत्वावर योजना राबविण्यासाठी लागणारा वाढीव खर्च (रु. ७९२.२० कोटी - रु.३५९.६७ कोटी) | :- | रु.४३२.५३ कोटी |
| • वरील योजनेतील एकुण अपेक्षित केंद्र शासन अनुदान. | :- | रु.२८७.७४ कोटी |
| • वरील योजनेतील एकुण अपेक्षित राज्य शासन अनुदान. | :- | |
| ➢ मुळ मंजुर योजनेनुसार (१०%) | | रु.३५.९७ कोटी |
| ➢ दिनांक ३१.०८.२००९ चा शासन निर्णय क्र. एनयुआर-२००९/ प्र.क्र.१२७/०९ नवि-३३ नुसार प्रकल्पाच्या वाढीव किंमतीच्या ५०% राज्य शासनाचे पुरक अनुदान (अपेक्षित) (रु.५११.३१ कोटी -रु.३५९.६७ कोटी) / २ | :- | रु.७५.८२ कोटी |
| **एकुण शासन अनुदान रु.३९९.५३ कोटी** | | |
| • उपरोक्त एकुण रु. ३९९.५३ कोटी शासन अनुदानापैकी केंद्र शासनाकडुन अपेक्षीत रु. २८७.७४ कोटी पैकी ५०% म्हणजेच रु. १४३.८६ कोटी चा पहिला हप्ता प्राप्त झाला आहे. | | |
| • वरील पी.पी.पी. योजनेतील महानगरपालिकेचा एकुण सहभाग { (रु. ४३२.५३ कोटी - रु. ७५.८२ कोटी)+रु. ३५.९७ कोटी} {महानगरपालिकेचा हिस्सा रक्कम रु. ३९२.६८ कोटी हा PPP Operator या योजनेत टाकणार आहे.} | :- | रु.३९२.६८ कोटी |

वरील प्रमाणे नमुद आर्थिक आकडेवारी व औरंगाबाद महानगरपालिकेची सद्य आर्थिक स्थिती पाहता UIDSSMT योजनेअंतर्गत मंजुर रुपये ३५९.६७ कोटीचा निधी संपुर्णपणे PPP Model ला जोडुन जायकवाडी पासुन औरंगाबाद शहरापर्यंत पाणी पुरवठा योजनेच्या उपांगांची कामे व संपुर्ण वितरण व्यवस्थेचे काम एकाच विकासकाकडुन PPP तत्वावर करुन घेण्याबाबत व योजना स्वयंपुर्ण होण्यासाठी आवश्यकतेनुसार पाणीपट्टीमध्ये दरवाढ करणे तसेच योजना PPP तत्वावर राबविणे बाबत दिनांक ३०.०७.२००९ रोजी मा.सचिव-२, नगर विकास यांचे दालनात मा. महापौर, मा. आयुक्त आणि इतर पदाधिकारी यांच्या बैठकीत चर्चा होऊन निर्णय झाला. त्यानुसार शहराची पाणी पुरवठा योजना PPP तत्वावर राबविणे व सदर वाढीव पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झाल्यानंतर पाणी

पट्टीमध्ये दरवाढ करण्याबाबतच्या प्रस्तावास ठराव क्र.५५४ अन्वये दिनांक १८.०८.२००९ रोजी संपन्न झ ाालेल्या सर्वसाधारण सभेने सर्वानुमते मान्यता दिलेली आहे.

पाणी पुरवठा योजना PPP तत्वावर राबविणे अंतर्गत निविदा कार्यवाही करण्यासाठी वित्त मंत्रालय, Department of Economical Affairs (DEA) तर्फे भारत सरकार यांच्या India Infrastructure Project Development Fund (IIPDF) योजने अंतर्गत एशियन डेव्हलपमेंट बँक (ADB) यांच्या सहकार्याने क्रिसील रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन लि. (Crisil) मुंबई यांची नेमणुक Transaction Adviser म्हणून करण्यात आलेली आहे. त्यानुसार Crisil च्या साह्याने व मार्गदर्शनानुसार PPP तत्वावर योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार निविदा कार्यवाही दोन टप्प्यात राबविण्यात येत आहे.

**Stage - 1 Request for Qualification (RFQ)**

Request for Qualification (RFQ) ची निविदा सुचना दिनांक २०.०८.२००९ रोजी देशपातळीवरील वृत्तपत्रांतुन प्रसिध्द करण्यात आली. दिनांक ०२.१२.२००९ रोजी सदर निविदा उघडण्यात आल्या असता एकुण ११ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी दोन निविदाधारक (१) **IVRCL-KIPL - SMC-CHETAS Consortium** आणि (२) **Ashoka Buildcon Limited** हे अपात्र ठरले. तसेच उर्वरित ९ निविदाधारक पात्र ठरले. पात्र निविदाधारकांची यादी खालीलप्रमाणे

1. **Veolia Water (India) Pvt. Ltd.**
2. **United Phosphorus Limited (UPL)**
   Pratibha Industries
   Salcon Engineering Berhad
3. **Subhash Project Marketing Limited, (SPML)**
   National water and sewerage Corporation (NWSC)
   Va tech Wabog Ltd.
4. **Mahindra Lifespace Developers Ltd. (MLDL)**
   Suez Environmetn.
5. **IL&FS Water Ltd.**
   M/s Puncak Niaga Holdings Berhad (PNHB)
6. **EA Infrastructure Operations Pvt. Ltd. (CASCALNV)**
   Nagarjuna Construction Compny Ltd. (NCC)
7. **Ranhill Utilities – Lead Member**
   JUSCO – Consortium Member
8. **Jindal Water Infrastructure Ltd.**
   Hindustan Construction Company (HCC)
   Manila water company
9. **JMC Projects India Ltd.**
   Metito Berlinwasser Ltd.
   SREI Infrastructure Finance Ltd.

**Stage – 2 Request for Proposal (RFP)**

या अतंर्गत Crisil Risk And Infrastructure Solution Ltd. संस्थेने Concession Agreement चे Draft Term Sheet (Concession Agreement मधील अटी व शर्ती चे विवरण) महानगरपालिकेकडे दिनांक ०८.१२.२००९ रोजी सादर केले.या प्रकरणी दिनांक २१.१२.२००९

(दिनांक ०८.१२.२००९ ची तहकुब सभा) रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेने ठराव क्र.७७५ अन्वये Concession Agreement च्या Draft Term Sheet ला तसेच Request for Proposal (RFP) Document ला मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मंजूर Draft Concession Agreement तसेच RFP document नुसार निविदा कार्यवाही सुरु करण्यात आली.

टप्पा -२ Request for Proposal (RFP) ची निविदा कार्यवाही प्रगती पथावर असून दिनांक ३०.११.२०१० रोजी निविदा दाखल करण्याच्या अंतिम वेळे पर्यंत पात्र ९ निविदाधारकांपैकी खालीलप्रमाणे दोन निविदा औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झाल्या.

1. **Subhash Project Marketing Limited (SPML)**
   National water and sewerage Corporation (NWSC)
   Va tech Wabag Ltd.
2. **IL&FS Water Ltd.**
   M/s Puncak Niaga Holdings Berhad (PNHB)

दिनांक ०१.१२.२०१० रोजी RFP निविदे च्या Technical Bid उघडण्यात आल्या. दरम्यान दोन्ही निविदांच्या तांत्रिक Bid ची तपासणी केल्यानंतर संबंधीत निविदाधारकांनी त्यांच्या Approach, Methodology & Business Plan संदर्भाने दिनांक १४.१२.२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिके अंतर्गत गठीत पी.पी.पी. सेल समोर सविस्तर सादरीकरण केले आणि त्याच दिवशी सर्व पी.पी.पी. सेलच्या सदस्यांसमक्ष व संबंधीत Bidders च्या प्रतिनिधींसमक्ष Financial Bid उघडण्यात आले. त्यात दोन्ही निविदाधारकांनी Annual Operational Support Grant (AOSG) मागीतलेली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| **1.** | **Subhash Project Marketing Limited (SPML)**<br>National water and sewerage Corporation (NWSC) Va tech Wabag Ltd. | :- | पहिल्या वर्षा करीता रुपये ६३ कोटी |
| **2.** | **IL&FS Water Ltd.**<br>M/s Puncak Niaga Holdings Berhad (PNHB) | :- | पहिल्या वर्षा करीता रुपये ११२.९० कोटी |

**Subhash Project Marketing Limited (SPML)** यांनी Annual Operational Support Grant (AOSG) म्हणुन प्रथम वर्षा करीता रुपये ६३ कोटी एवढी रक्कम मागितलेली आहे. या AOSG च्या रकमेची **IL&FS Water Ltd.** ने मागीतलेल्या AOSG च्या रुपये ११२.९० कोटी या रकमेशी तुलना करता SPML यांनी मागीतलेली AOSG ची रक्कम रुपये ४९.९० कोटी इतकी कमी आहे. तसेच **IL&FS Water Ltd.** यांनी सादर केलेल्या Financial Bid मध्ये अटी व शर्ती नमुद असल्याने त्यांची निविदा Non Responsive Bid ठरते.

## <u>योजनेच्या ठळक बाबी :</u>

**१. योजनेचा कालावधी:-**

- **Concession period - 20 Years**
  (From Appointed Date)
- **Preparatory Period - 6 Months**
  (From Execution of Concession Agreement to Appointed Date)
- **Construction & Rehabilitation Period - 3 years**
  (Appointed Date to Commercial Operation Date )
- **Operation & Maintenance Period - 17 years**
  (Commercial Operation Date to last day of the concession period )

२. निविदेच्या अटी व शर्तीनुसार Collection Account, Water Payment Account, Water Payment Reserve Account तसेच Independent Engineer आणि Independent Auditor यांच्या वार्षीक देयकांची रक्कम जमा करण्यासाठी वेगवेगळी स्वतंत्र बँक खाती Appointed date च्या वेळी महानगरपालिकेला उघडावी लागणार आहेत.

- **Collection Account:-** या स्वतंत्र खात्यात विकासकाने ग्राहकांकडून जमा केलेली पाणीपट्टीची रक्कम (User Charges) भरणा केली जाईल. या भरणा केलेल्या रकमेतुन योजनेचे विद्युत देयक, पाटबंधारे खात्याला द्यावयाचे पाणी खरेदीचे देयक व प्रतिनियुक्ती वर असलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते इ. रक्कम प्रत्येक महिन्याला कपात केली जाईल व उर्वरीत रक्कम विकासकाला देण्यासाठी Water Payment Account मध्ये दरमहा Transfer केली जाईल.
- **Water Payment Account:-** या खात्यामध्ये विकासकाला महानगरपालिकेने द्यावयाची AOSG ची रक्कम प्रत्येक तिन महीन्याला (Quarterly) जमा करावयाची आहे. निविदा अटी व शर्तीनुसार 75% Fixed Payment तिमाहीच्या (Quarter च्या) सुरुवातीला व 25% Variable Payment तिमाहीच्या शेवटी विकासकाला द्यावयाचे आहे. विकासकाला द्यावयाचे २५% Variable Payment हे विकासक देणार असलेल्या सेवा व सुविधांचा स्तर (Service Level Parameters) विचारात घेऊन द्यावयाचे आहे. Service Level Requirment आणि त्यानुसार विकासकास द्यावयाचे २५% Variable Payment याची कार्यपद्धती (Mechanism) सोबतच्या परीशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेली आहे.
- **Water Payment Reserve Account:-** निविदा अटी व शर्तीनुसार विकासकास, महानगरपालिकेकडुन Payment Security मिळावी या करीता हे बँक खाते महानगरपालिकेस उघडावे लागणार आहे. या खात्यामध्ये (1.5 x AOSG) एवढी रक्कम नेहमी करीता Deposit ठेवणे महानगरपालिकेस बंधनकारक राहणार आहे.
- **Independent Engineer and Independent Auditor यांच्या वार्षीक देयकांची रक्कम जमा करणेसाठी स्वतंत्र बँक खाते** :- निविदा अटी व शर्तीनुसार Independent Engineer करीता बांधकाम कालावधी मध्ये 2.35% of Project Cost + Service Tax आणि संचलन /देखभाल दुरुस्ती कालावधीमध्ये 0.25% of Project Cost + Service Tax तसेच Independent Auditor करीता संपुर्ण Concession Period मध्ये 0.10% of Project Cost + Service Tax याप्रमाणे वार्षिक देयके द्यावी लागणार आहेत. या देय रकमांच्या ५०% रक्कम महानगरपालिकेने व उर्वरीत ५०% रक्कम विकासकाने Independent Engineer आणि Independent Auditor यांना द्यावयाची असून प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला सदर रक्कम महानगरपालिका आणि विकासक यांनी स्वतंत्र संयुक्त बँक खात्यामध्ये जमा करावयाची आहे. महानगरपालिकेने यापूर्वीच मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.०८.२००८ मधील ठराव क्रमांक २६६ आणि मा.स्थायी समिती बैठक दिनांक ०४.०७.२००९ मधील ठराव क्रमांक ३० नुसार मे.युनिटी कन्सलटंट, पुणे यांची नेमणुक प्रकल्पाचे सल्लागार म्हणुन केलेली आहे. मे.युनिटी कन्सलटंट हेच पहिली

तीन वर्षे प्रकल्पाचे Independent Engineer म्हणुन काम पाहणार आहेत. त्याच प्रमाणे विकासकाशी Concession Agreement झाल्यानंतर Appointed Date पूर्वी Independent Auditor ची नेमणुक करण्यात येईल.

३. **Project Milestones and Project Grant:-** योजनेची अंदाजपत्रकीय किंमत रु.७९२.२० कोटी एवढी असून त्यापैकी Project Grant म्हणून एकुण शासन अनुदान रु. ३९९.५३ कोटी विकासकास तीन वर्षाच्या बांधकाम कालावधीत 12 Quarterly Milestones मध्ये द्यायचे आहेत. विकासकाला Equity (स्वत:च्या सहभागाची रक्कम) and Debt (कर्ज) च्या स्वरुपात रुपये ३९२.६८ कोटी रक्कम प्रकल्प उभारणीसाठी टाकावयाची आहे. सदर रक्कम विकासक एकुण 12 Quarterly Milestones मध्ये टाकणार आहे. या 12 Milestones बद्दलची म्हणजेच प्रत्येक Mile Stone मध्ये विकासक स्वत:ची किती रक्कम टाकेल व त्यात त्यास अपेक्षीत Project Grant किती असेल याची सविस्तर माहिती विकासक Preparatory Period दरम्यान महानगरपालिकेस सादर करणार आहे. बांधकाम कालावधीमध्ये द्यावयाची Project Grant ची रक्कम Annual Operational Support Grant च्या व्यतीरिक्त असेल. Project Grant देतांना प्रत्येक वेळी या रकमेच्या ५% रक्कम Contingency Reserve म्हणुन महानगरपालिकेतर्फे कपात केली जाणार आहे. सदरची रक्कम बांधकाम कालावधी पूर्ण झाल्यानंतर (योजना कार्यान्वीत झाल्यानंतर) चार तीमाही (Quarter) मध्ये समान हप्त्यात महानगरपालिकेने विकासकास परत द्यावयाची आहे.

महानगरपालिका Appointed Date च्या वेळी विकासकाला पहिल्या माईलस्टोनची Project Grant आगाऊ (Advance) स्वरुपात देईल. विकासक त्याचा Equity and Debt चा हिस्सा त्यामध्ये टाकेल. पहिल्या माईलस्टोनचे कमीत कमी ८५% काम पुर्ण झाल्यानंतर विकासक दुसऱ्या माईलस्टोनसाठी Project Grant ची मागणी करु शकेल. पहिल्या माईलस्टोन अंतर्गत केलेले काम Independent Engineer तपासुन प्रमाणीत करेल. त्यानंतरच दुसऱ्या माईलस्टोनसाठी Project Grant देय राहील. समजा जर पहिल्या माईलस्टोनचे काम ९०% पूर्ण झाले असेल तर दुसऱ्या माईलस्टोनसाठी 90% Project Grant आगाऊ स्वरुपात देय राहील.

दुसऱ्या माईलस्टोनचे कमीत कमी ८५% काम पूर्ण झाल्यानंतर व पहिल्या माईलस्टोनचे १००% काम पूर्ण झाल्यानंतरच विकासक तिसऱ्या माईलस्टोनसाठी Project Grant ची मागणी करु शकतो. पहिल्या माईलस्टोनचे १००% काम पुर्ण झाले नसेल तर कोणत्याही परिस्थितीत तिसऱ्या माईलस्टोन करीता Project Grant देय होणार नाही. दुसऱ्या माईलस्टोनचे किमान ८५% काम पुर्ण व पहिल्या माईलस्टोनचे १००% काम पुर्ण झाले तरच तीसऱ्या माईलस्टोन करीता आधिच्या माईलस्टोनचे राहीलेले 10%+85% of Third Milstone एवढी रक्कम Project Grant म्हणुन देय राहील. या पध्दती प्रमाणे पुढील प्रत्येक माईलस्टोनसाठी Project Grant देय राहील. ही कार्यवाही कशा प्रकारे करावयाची आहे या संबंधीची तरतुद Concession Agreement मध्ये करण्यात आलेली आहे.

४. विकासकाला पहिल्या वर्षी AOSG म्हणून रुपये ६३ कोटी रक्कम दयावयाची आहे. निविदा अटी व शर्तीनुसार विकासकाने पहिल्या वर्षी मागीतलेल्या AOSG रकमेवर प्रतिवर्ष ६% Escalation प्रमाणे पुढील २० वर्ष AOSG ची रक्कम द्यावी लागणार आहे. तसेच Water Payment Reserve Account मध्ये 1.5 x AOSG i.e. 1.5 x Rs.63 कोटी = रुपये 94.50 कोटी एवढी रक्कम पहिल्या वर्षी Deposit करावी लागणार आहे. ही रक्कम प्रत्येक

वर्षीच्या AOSG (6% Escalation) नुसार त्या त्या प्रमाणात Water Payment Reserve Account मध्ये वाढवुन भरावी लागणार आहे. या प्रमाणे रुपये ६३ कोटी + रुपये ९४.५० कोटी = रुपये १५४.५० कोटी एवढी रक्कम महानगरपालिकेला Appointed Date ला उभारावी लागणार आहे. महानगरपालिकेचे इतर स्त्रोत जसे जकात, मालमत्ता कर, नगररचना विभागाकडून प्राप्त होणारी रक्कम इत्यादी रकमेमधून ही AOSG ची आणि Water Payment Reserve Account ची रक्कम उभारावी लागेल. तसेच त्यासाठी महानगरपालिकेला दरवर्षी अर्थसंकल्पात प्राधान्याने तरतुद करावी लागणार आहे. Appointed date ते Concession period संपण्याची तारीख अशा एकुण २० वर्षात दरवर्षी किती AOSG द्यावी लागेल तसेच Water Payment Reserve Account मध्ये त्या-त्या वर्षी (एकुण २० वर्षांच्या कालावधीत) किती रक्कम जमा ठेवावी लागेल याचा तपशील सोबत परिशिष्ठ ''ब'' मध्ये दिला आहे.

५. निविदा अटी व शर्ती नुसार Concession Period -20 वर्ष आहे. या कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या वतीने विकासक पाणीपट्टीची वसुली करणार आहे. दर तिन वर्षांनी २५% दराने पाणीपट्टीचे दर वाढविण्यास सर्वसाधरण सभेने ठराव क्र.-५५४ दिनांक १८.०८.२००९ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार पुढील २० वर्षांकरीता पाणीपट्टीचे दर अंतीम केलेले आहेत. योजना कार्यान्वीत झाल्यानंतर हे दर अंमलात येतील. या वाढीव दराने पाणीपट्टीची वसुली विकासकास महानगरपालिकेने जर करु दिली नाही तर निविदा अटी व शर्तीनुसार पाणीपट्टीच्या फरकाची रक्कम स्वत:च्या मिळकती मधुन महानगरपालिकेला विकासकासाठी उघडलेल्या Collection Account मध्ये भरावी लागेल. अग्निशमन सेवा वगळता इतर कोणत्याही कारणासाठी, कोणत्याही संस्था, व्यक्ति यांना नि:शुल्क पाणी पुरवठा करता येणार नाही. जर महानगरपालिकेच्या आदेशानुसार असा नि:शुल्क पाणी पुरवठा विकासकास करावा लागला तर अशा पाणी पुरवठ्याचे देयक प्रचलित दरानुसार महानगरपालिकेस विकासकास द्यावे लागेल.

६. Appointed Date नंतर विकासक महानगरपालिकेच्या वतीने पाणीपट्टी वसुली करणार आहे. त्यात पाणीपट्टीच्या देयकांचे संगणकीकरण आणि वसुलीची कार्यक्षम यंत्रणा उभारणेचा समावेश आहे. Appointed Date च्या आधीची थकीत पाणीपट्टीची रक्कम (Arrears) निविदा अटी व शर्तीनुसार विकासकाला Incentive देऊन विकासका मार्फत वसुली करुन घेण्यात येणार आहे. सदर Incentive देण्याबाबतची कार्यपद्धती Concession Agreement मध्ये नमुद असून, सोबत परिशिष्ठ ''क'' मध्ये नमुद करण्यात आली आहे.

७. विद्युत देयकामध्ये दरवर्षी १०% वाढ व पाटबंधारे खात्याला द्यावयाच्या पाणी खरेदी देयकामध्ये दरवर्षी १५% वाढ होईल असे निविदेमध्ये गृहीत धरलेले आहे. ही वाढीव रक्कम विकासकानेच भरणे बंधनकारक आहे. जर या पेक्षा अधिक दर (१०% आणि १५% पेक्षा जास्त) वाढल्यास त्यावरील फरकाची रक्कम महानगरपालिकेला भरावी लागणार आहे.

८.

- जर शासनाकडुन मिळणारे प्रकल्पाचे अनुदान उशीरा प्राप्त झाले व Project Milestone नुसार Project Grant देण्यास महानगरपालिकेस उशीर झाला तर अशा परिस्थितीमध्ये विकासक प्रकल्पासाठी स्वत: रक्कम उभारेल व प्रकल्पाच्या कामांमध्ये खंड पडणार नाही याची दक्षता घेईल. विकासकाने उभारलेल्या अशा रकमेसाठी विकासकास १५% व्याज देणे महानगरपालिकेला बंधनकारक राहील.

- एखाद्या परिस्थितीमध्ये शासनाकडुन पुढील अनुदान मिळाले नाही तर अशी रक्कम विकासक स्वत: उभारेल. अशा रक्कमेची परतफेड करण्यासाठी महानगरपालिका विकासकाला प्रत्यक्ष रक्कम देईल किंवा पाणीपट्टीचे दर वाढवुन देईल किंवा Concession Period वाढवुन देईल. मात्र वाढीव Concession Period हा जास्तीत जास्त दहा वर्षापेक्षा अधिक असणार नाही.
- या निविदे मध्ये समाविष्ट असलेल्या कामांव्यतीरीक्त Additional Work करणे आवश्यक असेल तर महानगरपालिकेच्या मान्यतेने विकासक Change in Scope नुसार असे काम करु शकतो. अशा कामांसाठी येणारा खर्च निविदा अटी व शर्तीनुसार महानगरपालिकेने त्या त्या वर्षीच्या दरसुची नुसार / बाजार भावानुसार (ज्या बाबी दरसुची मध्ये समाविष्ट नसतील त्या बाबींसाठी) विकासकाला देणे बंधनकारक आहे.

९. क्रिसील या Transaction Adviser च्या शुल्काची रक्कम वित्त मंत्रालय, Department of Economical Affairs (DEA), भारत सरकार व एशियन डेव्हलपमेंट बँक (ADB) हे ७५%: २५% या प्रमाणात अनुक्रमे रुपये ९२,०४,०००/- आणि रुपये ३०,८१,१२०/- अशी एकुण रुपये १,२२,८५,१२०/- अदा करीत आहेत. यापैकी DEA, भारत सरकार यांच्या हिश्याची रक्कम IIPDF योजनेच्या अटी व शर्ती नुसार त्यांना परत करणे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे. RFP निविदेच्या अटी व शर्तीनुसार विकासक उपरोक्त प्रमाणे रुपये ९२,०४,०००,/- एवढी रक्कम Concession Agreement च्या वेळेस DEA, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांना परत करणार आहे. तसेच मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी योजनेचे तांत्रिक मुल्यांकन केलेले असून, मुल्यांकन तपासणी शुल्क रुपये ८२,४६,०००/- ही रक्कम RFP निविदेच्या अटी व शर्ती नुसार विकासक Concession Agreement च्या वेळेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांना देणार आहे. असे एकुण रक्कम रुपये १,७४,५०,०००/- Concessionaire कडुन महानगरपालिकेत प्रथम जमा करुन घेण्यात येतील व तद्नंतर त्या-त्या शासकीय यंत्रणेस परत करण्यात येतील.

१०. Concession कालावधीमध्ये नागरिकांकडुन जमा केली जाणारी पाणीपट्टीची संपूर्ण रक्कम व Annual Operational Support Grant या दोन्ही बाबी २० वर्षाच्या Concession कालावधीमध्ये विकासकास देय आहेत. विकासक बांधकाम कालावधीमध्ये शहरातील अस्तित्वातील सर्व ग्राहकांच्या नळजोडण्या Medium Density Poly Ethelene (MDPE) पाईपने बदलणार आहे आणि नविन जोडण्या देणार आहे तसेच प्रत्येक नळजोडणीला स्वतंत्र जलमापक यंत्र (Consumer Meter) बसविणार आहे. योजना कार्यान्वीत झाल्या नंतर सदरचा खर्च विकासक ग्राहकांकडुन पुढील पाच वर्षांमध्ये समान हप्त्यात वसुल करणार आहे. याबाबतची कार्यपद्धती Concession Agreement मध्ये समाविष्ट केलेली आहे.

११. केंद्र शासनाच्या UIDSSMT योजने अंतर्गत महानगरपालिकेने शासना सोबत करारनामा केलेला असून शासनाच्या मार्गदर्शक सुचना व अटी - शर्तीनुसार महानगरपालिकेस विविध सुधारणा (Reforms) राबविणे बंधनकारक आहे. शासनाकडुन महानगरपालिकेस या प्रकल्पासाठी पुढील उर्वरित अनुदान मिळण्यासाठी या सुधारणा प्राधान्याने राबविणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. औरंगाबाद महानगरपालिकेस ज्या सुधारणा

(Reforms) राबविणे बंधनकारक आहे त्याची थोडक्यात माहिती परिशिष्ट "ड" वर दर्शविण्यात आली आहे.

१२. पी.पी.पी. औरंगाबाद वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ७९२.२० कोटी एवढी आहे. मुळ DPR मध्ये वितरण व्यवस्थे करीता DI पाईपची मान्यता असल्याने पी.पी.पी. योजने अंतर्गत DI पाईप गृहीत धरुन अंदाजपत्रक केलेले आहे. सध्या आधुनीक तंत्रज्ञानाने विकसीत High Density Poly Ethelene (HDPE) पाईपचा वापर इतर शहरांमध्ये पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेकरीता सुरु झालेला आहे. या पाईपच्या वापरामुळे गळत्यांचे प्रमाण लक्षणिय रित्या कमी होऊ शकते. निविदा अटी व शर्ती नुसार वितरण व्यवस्थेमध्ये DI पाईप ऐवजी Combination of HDPE + DI Pipe वापरण्यास 'केंद्र व राज्य शासनाकडुन आवश्यक ती मान्यता प्राप्त करणे, अशा बदलामुळे महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भार सोसावा न लागणे, विकासकाने द्यावयाच्या सेवा सुविधांचा स्तर हा Service Level Requirment नुसार असणे आणि शासनाने अशा बदलास मान्यता न दिल्यास वितरण व्यवस्थेत फक्त DI पाईप वापरणे' अशा अटींवर विकासकास मुभा देण्यात आलेली आहे.

१३. <u>**प्रकल्पासाठी भुसंपादन करणे.:-**</u> जायकवाडी पासून औरंगाबाद शहरापर्यंत मुख्य जलवाहिनी टाकण्यासाठी भुसंपादन करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. या अंतर्गत एकुण ३८.५० किलोमीटर पैकी ३२.५० किलोमीटर लांबी मध्ये संयुक्त मोजणी सर्वेक्षण (JMS) चे काम पुर्ण झालेले आहे. भुसंपादन करुन जागा विकासकाच्या ताब्यात प्रकल्पाच्या वेळापत्रकानुसार देणे महानगरपालिकेला बंधनकारक आहे. निविदा अटी व शर्तीनुसार भुसंपादन करुन जागा विकासकाच्या ताब्यात देण्यास उशीर झाल्यास महानगरपालिकेस आर्थिक बोजा सोसावा लागेल. या बाबतची कार्यपध्दती Concession Agreement मध्ये दर्शविली आहे. भुसंपादना करीता साधारणत: रुपये ३० कोटी रकमेची आवश्यकता असून या रकमेची तरतुद अर्थसंकल्पात प्राधान्याने करणे अत्यंत आवश्यक आहे.

१४. समांतर पाणी पुरवठा योजनेची कामे लवकरच सुरु होणार असल्याने या पुढे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठयाची कोणतीही कामे प्रस्तावीत करता येणार नाहीत तसेच ज्या कामांचे कार्यादेश अद्याप झालेले नाहीत अशी कामे रद्द करणे आवश्यक आहे. जेणे करुन महानगरपालिकेचे आर्थिक हित जोपासले जाईल. या कार्यवाहीस देखील मान्यता व्हावी.

१५. दिनांक १४.०१.२०११ रोजी Subhash Project Marketing Ltd. (SPML) यांनी दाखल केलेल्या निविदा दरा संदर्भाने Negotiation करण्यासाठी महानगरपालिके अंतर्गत असलेल्या PPP Cell च्या सर्व सदस्यांच्या व निविदाधारकांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत बैठक संपन्न झाली. बैठकीत SPML यांनी भरलेल्या दराबाबत सविस्तर चर्चा झाली व दर कमी करावेत अशा सुचना देण्यात आल्या. त्यावर SPML यांनी त्यांच्या Financial Model संदर्भाने सविस्तर माहिती दिली. त्याच सोबत उपांगनिहाय तुलनात्मक किंमतीचे विवरण सादर केले. या PPP Model अंतर्गत मोठया प्रमाणात Business Risk असुन २० वर्षा पर्यंत प्रकल्प चालविण्याची जबाबदारी असल्याने निविदे अंतर्गत सादर केलेले दर योग्य असल्याने AOSG ची रक्क म कमी करणे शक्य नसल्याचे SPML यांनी बैठकीत सांगीतले. याप्रकल्पाचे Transaction Advisor क्रिसील या संस्थेने तसेच युनिटी कन्सलटंट

प्रा. लि., पुणे यांनी SPML यांची निविदा मान्य करण्यास हरकत नसल्याचे लेखी स्वरुपात कळविलेले आहे.

१६. Concessionaire ला द्यावयाची AOSG ची रक्कम व Water Payment Reserve Account मध्ये ठेवावयाची रक्कम महानगरपालिका कशी उभारेल याबाबत मुख्य लेखाधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता सदर संक्षिप्त तपशिल मुख्य लेखाधिकारी यांनी कळविल्या प्रमाणे खालीलप्रमाणे आहे.

- सन २०१०-११ या वर्षाचा अर्थसंकल्प रुपये ४०० कोटी चा असून प्रत्यक्ष संभाव्य प्राप्ती / उत्पन्न सुमारे २६५ कोटी रुपये राहील. यातुन बांधील व अनिवार्य (mandatory) खर्च रुपये १५८ कोटी वजा जाता निव्वळ **रुपये १०७ कोटी शिल्लक राहतील.**
- स्पील ओव्हर कामाचे दायीत्व - रुपये ७६.३३ कोटी

- **शिल्लक रक्कम (रुपये १०७ कोटी -रुपये ७६.३३ कोटी )= रुपये ३०.६७ कोटी**

- देय कर्ज

| | |
|---|---|
| - IDBI Bank | - रुपये ५.५२ कोटी |
| - पोलिस विभाग | - रुपये १.०० कोटी |
| - रस्ते विकास महामंडळ | - रुपये १.०० कोटी |
| - नगर रचना आस्थापना | - रुपये १.२० कोटी |
| | **एकुण - रुपये ८.७२ कोटी** |

- **शिल्लक रक्कम (रुपये ३०.६७ कोटी - रुपये ८.७२ कोटी )= रुपये २१.९५ कोटी**

- सध्या महानगरपालिका औरंगाबाद पाणी पुरवठा योजना चालवते. त्यासाठी साधारणत: खालीलप्रमाणे खर्च प्रति वर्ष होत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| i. | कर्मचारी वेतन व भत्ते | - रुपये ७.४० कोटी |
| ii. | विद्युत देयक | - रुपये २७.६० कोटी |
| iii. | पाटबंधारे खात्याकडुन पाणी खरेदी | - रुपये २.४० कोटी |
| iv. | देखभाल दुरुस्ती | - रुपये ६.९५ कोटी |
| v. | रसायन सामुग्री | - रुपये १.४५ कोटी |
| vi. | मशिनरी देखभाल | - रुपये १.८० कोटी |
| vii. | वॉटर सेस | - रुपये ०.१५ कोटी |
| | | **एकुण - रुपये ४७.७५ कोटी** |

या योजनेवरील उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च, ही योजना Concessionaire कडे हस्तांतरीत झाल्यानंतर महानगरपालिकेला करावा लागणार नाही. त्यामुळे रु.४७.७५ कोटी इतकी रक्कम महानगरपालिका संबंधीत Concessionaire ला द्यावयाच्या AOSG च्या रकमेत टाकू शकेल.

**एकुण शिल्लक राहणारी रक्कम - (रु. २१.९५ कोटी + रु. ४७.७५ कोटी ) = रु.६९.७० कोटी**

- **विकासकास पहिल्या वर्षी देय असलेली रक्कम**
  - i. Annual Operational Support Grant (AOSG) - रुपये ६३ कोटी
  - ii. पाणीपट्टीची रक्कम सुमारे - रुपये २३.५० ोटी

**एकुण देय - रुपये ८६.५० कोटी**

वरील आकडेवारी पाहता एकुण द्यावी लागणारी रक्कम रुपये ८६.५० कोटी प्रथम वर्षासाठी असून शिल्लक रुपये ६९.७० कोटी इतकी आहे. म्हणजेच रुपये १६.८० कोटीची तुट आहे. प्रस्तावीत खर्चात चालु आर्थिक वर्षातील रुपये २११ कोटीच्या विकास कामाचा समावेश नाही.

- विकासकास AOSG म्हणुन जे रुपये ६३ कोटी द्यावयाचे आहेत. त्यासाठी कठोर आर्थिक शिस्त निर्माण करण्या बरोबरच खालील उपाय योजना कराव्या लागतील.
  - **i.** प्रशासकीय खर्चात काटकसर करणे.
  - **ii.** आवश्यक / फक्त देखभाल दुरुस्तीची अत्यावश्यक कामे वगळता इतर विकास कामे तुर्त स्थगीत करणे.
  - **iii.** उत्पन्नाचे स्त्रोत बळकट करुन मालमत्ता कर व इतर कर प्रभावी पणे वसुल करणे.
  - **iv.** उत्पन्नाचे नविन स्त्रोत निर्माण करणे.
  - **v.** शासनाकडुन विशेष अनुदानाची मागणी करणे.
  - **vi.** वित्त आयोगाकडुन मिळणाऱ्या अनुदानातुन काही रक्कम नियमितपणे AOSG साठी वापरणे.

यासर्व बाबींवर गंभिरपणे विचार करुन काही कठोर आर्थिक शिस्तीचे निर्णय घेतले गेल्यास AOSG नियमीतपणे अदा करता येईल अन्यथा नाही. तसेच निविदा अटी व शर्ती नुसार वॉटर पेमेंट रिजर्व अकाऊंट स्वतंत्रपणे उघडुन AOSG च्या १.५ (दिड पट) रक्कम प्रमाणात सदर खात्यात जमा करावी लागणार आहे. जर रुपये ६३ कोटीची अदाई नियमीतपणे झाली नाही तर तेवढी रक्कम परस्पर वॉटर पेमेंट रिजर्व अकाऊंट मधुन विकासक काढुन घेऊ (Withdraw) शकतो. या करीता साधारणत: पहिल्या वर्षा करीता महानगरपालिकेस रुपये ९४.५० कोटी जमा करावे लागतील. सदरची रक्कम महानगरपालिकेच्या उत्पन्नातुन जमा करणे तुर्त तरी शक्य दिसत नाही. यासाठी बँके कडुन कर्ज उभारणे आवश्यक राहील. अशा प्रकारचा अभिप्राय मुख्य लेखाधिकारी यांनी दिलेला आहे.

त्यानुसार उपरोक्त प्रमाणे योजनेच्या ठळक बाबीं अंतर्गत मुद्दा क्र. १ ते १६ मध्ये सविस्तर दर्शविल्या प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

१. या कामासाठी लागणारी पहिल्या वर्षा करीता रु. ६३ कोटी + रु. ९४.५० कोटी अशी एकुण रु. १५४.५० कोटी रक्कमेची तरतुद महानगरपालिकेच्या इतर वार्षिक उत्पन्नातुन अर्थसंकल्पात या प्रकल्पा करीता प्राधान्याने करणे आणि त्यास्तव इतर कामे (देखभाल दुरुस्तीची कामे वगळता) स्थगित करणे.

२. **Subhash Project Marketing Limited (SPML)** या निविदा धारकाने Annual Operational Support Grant (AOSG) म्हणुन पहिल्या वर्षाकरीता मागितलेली रक्कम रुपये ६३ कोटी तसेच पुढील २० वर्षा करीता या AOSG च्या रक्कमेवर दर वर्षी 6 % दराने होणाऱ्या वाढीस (Escalation) मान्यता देणे.

३. **Subhash Project Marketing Limited (SPML)** यांना संपुर्ण Concession Period मध्ये वसुल होणारी पाणीपट्टीची रक्कम देणे.

४. महानगरपालिकेस केंद्र शासन तसेच राज्य शासन यांचे कडुन मिळणारे प्रकल्प अनुदान रु. ३९९.५३ कोटी रक्कम बांधकाम कालावधीमध्ये टप्प्याटप्प्याने Project Grant म्हणुन देण्यास आणि

रुपये ३९९.५३ कोटी या Project Grant सह रुपये ७९२.२० कोटींचा प्रकल्प SPML यांचेतर्फे उभारणी करणेस मान्यता देणे.

५. **Subhash Project Marketing Limited (SPML)** यांना औरंगाबाद शहर पाणी पुरवठयाचे संपुर्ण Assets २० वर्षा करीता हस्तांतरीत करणे व त्यांना Concessionaire म्हणुन २० वर्षांकरीता नेमणेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर."

# परिशिष्ट "अ"

## सेवा स्तर गरजा

विकासकाने पुरवायच्या सेवा स्तर गरजांची खालील दोन वर्गवारीमध्ये विभागणी केलेली आहे.

१. **भाग अ - पूर्व COD सेवा स्तर गरजा:-** या सेवा स्तर गरजा प्रकल्पाचे बांधकाम व पुर्नवसन कालावधी करीता म्हणजेच Concession कालावधीतील वर्ष १ ते ३ करीता लागु राहतील.

२. **भाग ब - COD नंतरच्या सेवा स्तर गरजा:-** या सेवा स्तर गरजा प्रकल्पाचे संचलन व देखभाल दुरुस्ती कालावधी करीता म्हणजेच Concession कालावधीतील वर्ष ४ ते २० करीता लागु राहतील.

- औरंगाबाद महानगरपालिका Annual Operational Support Payment समान हप्त्यात प्रति तिमाही अदा करेल. तिमाही हप्ता हा Annual Operational Support Payment च्या २५% इतका असून त्या वर्षासाठी लागु राहील. प्रत्येक तिमाही हप्ता हा दोन भागात विभागलेला आहे.

    १. **निश्चित देयक (Fixed Payment):-** हे एकुण तिमाही Operational Support Payment च्या ७५% इतके असून प्रत्येक तिमाही च्या सुरुवातीस देण्यात येईल. हे देयक कुठल्याही सेवा स्तर गरजांशी निगडीत नाही.

    २. **अनिश्चित देयक (Variable Payment):-** हे एकुण तिमाही Operational Support Payment च्या २५% इतके असून प्रत्येक तिमाही च्या शेवटी देण्यात येईल. हे देयक विकासकाने पुरवावयाच्या सेवा स्तर गरजांशी निगडीत राहील. अनिश्चित देयक हे स्वतंत्र अभियंत्याच्या मान्यतेनंतर अदा करण्यात येईल.

- प्रकल्पाच्या बांधकाम व पुर्नवसन कालावधी म्हणजेच Concession कालावधीतील वर्ष १ ते ३ दरम्यान अनिश्चित देयक (Variable Payment) अदा करण्यासाठी खालील तक्त्यात प्रणाली दर्शवीलेली आहे.

| अ.क्र. | मानक | सेवा स्तर गरजा | | |
|---|---|---|---|---|
| | | वर्ष १ | वर्ष २ | वर्ष ३ |
| १ | शुध्द पाण्याचे उत्पादन | कमीत कमी १३५ द.ल.ली. | कमीत कमी १३५ द.ल.ली. | कमीत कमी १३५ द.ल.ली. |
| २ | घाऊक पाण्याच्या मोजमापा करीता मीटर्स बसविणे. | स्वतंत्र अभियंता व विकासक यांच्या समन्वयाने १००% ठिकाणी बसविणे | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती |
| ३ | वितरण व्यवस्थे अंतर्गत घाऊक मीटर्स बसविणे | स्वतंत्र अभियंता व विकासक यांच्या समन्वयाने १००% ठिकाणी बसविणे | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | सेवा पुरविण्याच्या भागाची व्याप्ती | महानगरपालिकेच्या अस्तीत्वातील १००% ग्राहकांना शुध्द पाणी पुरवीणे तसेच महानगरपालिका हद्दीतील नविन ग्राहकांना पाणी पुरविणे | महानगरपालिकेच्या अस्तीत्वातील १००% ग्राहकांना शुध्द पाणी पुरवीणे तसेच महानगरपालिका हद्दीतील नविन ग्राहकांना पाणी पुरविणे | महानगरपालिकेच्या अस्तीत्वातील १००% ग्राहकांना शुध्द पाणी पुरवीणे तसेच महानगरपालिका हद्दीतील नविन ग्राहकांना पाणी पुरविणे |
| ५ | घरगुती ग्राहकांचे सर्वेक्षण [१] | १००% घरांचे | नविन कनेक्शन सह संपुर्ण माहिती. | नविन कनेक्शन सह संपुर्ण माहिती. |
| ६ | ग्राहकांच्या नळ कनेक्शनला जलमापक यंत्रे बसविणे [२] | एकुण ग्राहकांच्या १०% | एकुण ग्राहकांच्या ४०% | एकुण ग्राहकांच्या १००% |
| ७ | ग्राहकांच्या तक्रारी नोंदविणे आणि संनियंत्रण व्यवस्था | ---- | दुसऱ्या वर्षीच्या Concession कालावधीच्या शेवटी प्रत्यक्ष कृतीत आणने | व्यवस्थेची नियमीत देखभाल |
| ८ | संगणकीय देयक आणि वसुलीची व्यवस्था | ---- | दुसऱ्या वर्षीच्या Concession कालावधीच्या शेवटी प्रत्यक्ष कृतीत आणने | व्यवस्थेची नियमीत देखभाल |
| ९ | पाणी पुरवठा | ---- | प्रत्येक ग्राहकाला दररोज पाणी पुरवठा करणे | प्रत्येक ग्राहकाला दररोज पाणी पुरवठा करणे |

बांधकाम आणि पुर्नवसन कालावधीत अदा करावयाचे अनिश्चित देयक खालीलप्रमाणे राहील.

१. **वर्ष १:-** सेवा स्तर मानकांशी कुठलाही संबंध न जोडता.
२. **वर्ष २:-** Concession कालावधीच्या पहिल्या वर्षा करीता ठरविलेले सेवा स्तर मानक पुर्ण झाल्यावर. जर विकासक Concession कालावधीच्या पहिल्या वर्षाचे सेवा स्तर मानक पुर्ण करु शकला नाही, तर महानगरपालिका अनिश्चित देयक राखुन ठेवेल. अशा प्रकारचे दुसऱ्या वर्षा करीता राखुन ठेवलेले अनिश्चित देयक Concession कालावधीच्या पहिल्या वर्षा करीता ठरविलेले सेवा स्तर मानक पुर्ण झाल्यावर अदा करण्यात येईल.
३. **वर्ष ३:-** Concession कालावधीच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षा करीता ठरविलेले सेवा स्तर मानक पुर्ण झाल्यावर. जर विकासक Concession कालावधीच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाचे सेवा स्तर मानक पुर्ण करु शकला नाही तर महानगरपालिका तीसऱ्या वर्षाचे अनिश्चित देयक राखुन ठेवेल. अशा प्रकारे राखुन ठेवलेले. तीसऱ्या वर्षा करीताचे अनिश्चित देयक Concession कालावधीच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षा करीता ठरविलेले सेवा स्तर मानक पुर्ण झाल्यावर अदा करण्यात येईल.

टिप:- १. महानगरपालिका घरगुती ग्राहकांच्या सर्वेक्षण करीता अटी व संदर्भ देईल.
२. प्रत्येक नविन कनेक्शन मीटर सह देण्यात येईल.

- प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्ती कालावधी म्हणजेच Concession कालावधीतील वर्ष ४ ते २० दरम्यान अनिश्चित देयक (Variable Payment) अदा करण्यासाठी खालील तक्त्यात प्रणाली दर्शवीलेली आहे.

| अ.क्र. | मानक | सेवा स्तर गरजा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | % | वर्ष ४ | वर्ष ५ | वर्ष ६ | वर्ष ७ ते २० |
| १ | ग्राहकांची व्याप्ती | २५% | सेवा द्यायच्या क्षेत्रामध्ये १००% व्याप्ती | सेवा द्यायच्या क्षेत्रामध्ये १००% व्याप्ती | सेवा द्यायच्या क्षेत्रामध्ये १००% व्याप्ती | सेवा द्यायच्या क्षेत्रामध्ये १००% व्याप्ती |
| २ | ग्राहकांच्या जलमापक यंत्रांची कार्यक्षमता [३] | १०% | एकुण ग्राहकांचे कमीत कमी सरासरी ९५% ग्राहकांचे मीटर्स कार्यरत असावेत. | एकुण ग्राहकांचे कमीत कमी सरासरी ९५% ग्राहकांचे मीटर्स कार्यरत असावेत. | एकुण ग्राहकांचे कमीत कमी सरासरी ९५% ग्राहकांचे मीटर्स कार्यरत असावेत. | एकुण ग्राहकांचे कमीत कमी सरासरी ९५% ग्राहकांचे मीटर्स कार्यरत असावेत. |
| ३ | पाणी व्यय [४] | २५% | जास्तीत जास्त २५% | जास्तीत जास्त २०% | जास्तीत जास्त १५% | जास्तीत जास्त १५% |
| ४ | तक्रार व्यवस्थापन प्रणाली | १०% | किमान ८०% प्राप्त तक्रारी २४ तासात तपासणे आणि तक्रार नोंदणी नंतर ७२ तासात निवारण करणे | किमान ८०% प्राप्त तक्रारी २४ तासात तपासणे आणि तक्रार नोंदणी नंतर ७२ तासात निवारण करणे | किमान ८०% प्राप्त तक्रारी २४ तासात तपासणे आणि तक्रार नोंदणी नंतर ७२ तासात निवारण करणे | किमान ८०% प्राप्त तक्रारी २४ तासात तपासणे आणि तक्रार नोंदणी नंतर ७२ तासात निवारण करणे |
| ५ | पाणी पुरवठा [५] | २०% | सर्वग्राहकांना दररोज पाणी पुरवठा | शेवटच्या ग्राहका पर्यंत २४ तास वर्ष भर | शेवटच्या ग्राहका पर्यंत २४ तास वर्ष भर | शेवटच्या ग्राहका पर्यंत २४ तास वर्ष भर |
| ६ | पाणी पुरवठयाची शुध्दता | १०% | CPHEEO मानकानुसार | CPHEEO मानकानुसार | CPHEEO मानकानुसार | CPHEEO मानकानुसार |

टिप:-

३ या मानकाची तपासणी विकासकाने स्वतंत्र अभियंत्याला सादर केलेल्या तीमाही अहवालानुसार करण्यात येईल. या अंतर्गत शेवटच्या ग्राहकाकडे बसविलेल्या एकुण मीटर पैकी १% नमुना ग्रहीत धरला जाईल.

४ पाणी व्यय म्हणजे उद्‌भवाच्या ठिकाणी उचलले जाणारे अशध्द पाणी वजा देयकानुसार शेवटच्या ग्राहकाला दिलेले पाणी अधिक अग्निशमन साठी पुरविण्यात आलेले निशुल्क पाणी वापर. पाणी देयकांची गणना पाणी वापर करणाऱ्या ग्राहकांच्या एकत्रीत बिजकांनुसार (Invoice) तर उद्‌भवाच्या ठिकाणी उचलल्या जाणाऱ्या अशुध्द पाण्याची गणना पाटबंधारे विभागाने दिलेल्या बिजका नुसार राहील.

५ मानकाची गणना स्वतंत्र अभियंता आणि विकासकाने संयुक्त रीत्या ठरविलेल्या ठिकाणच्या पाण्याच्या दाबानुसार राहील.

खालील अटी नुसार संचलन व देखभाल दुरुस्ती कालावधीतील अनिश्चित देयके अदा करण्यात येतील.

१. **अट १:-** बांधकाम व पुर्नवसन कालावधीत म्हणजेच वर्ष १ ते वर्ष ३ मध्ये ठरविलेले सेवा स्तर मानक पुर्ण झाल्यावर जर बांधकाम आणि पुर्नवसन कालावधीमध्ये कुठलेही सेवास्तर मानक विकासकाने पुर्ण केले नाही, तर महानगरपालिका अनिश्चित देयक राखुन ठेवले. हे अनिश्चित देयक Concession कालावधीतील बांधकाम व पुर्नवसनाचे विहित सेवा स्तर मानक पुर्ण झ्ााल्यावर म्हणजेच वर्ष ४ ते वर्ष २० मध्ये अदा करण्यात येईल.

2. **अट २:-** Concession कालावधीतील संचलन देखभाल दुरुस्ती या कालावधीतील म्हणजेच वर्ष ४ ते वर्ष २० मध्ये सेवास्तर गरजा पुर्ण झाल्यावर अनिश्चित देयक प्रत्येक सेवा स्तर गरजेला दिलेल्या टक्केवारी नुसार अदा करण्यात येईल. जर विकासक सेवा स्तर गरजा पुर्ण करु शकला नाही तर विकासकाला अदा करायचे अनिश्चित देयक त्यानुषंगाने महानगरपालिका वजा करेल. Concession कालावधीतील वर्ष ४ ते २० दरम्यान सेवा स्तर गरजा पुर्ण न केल्याने त्यामुळे वजा केलेली रक्कम विकासकाला अदा करण्यात येणार नाही.

टिप:- ६ उदा. समजा विकासकाला अनिश्चित देयक रुपये ५० लक्ष तीमाही Oprational Support Payment लागु असेल आणि तो ग्राहक व्याप्तीचे मानक पुर्ण करु शकला नाही तर महानगरपालिका तीमाही Oprational Support Payment च्या १०% रक्कम म्हणजेच रु. ५ लक्ष वजा करुन उर्वरीत रु. ४५ लक्ष अनिश्चित देयकापोटी तीमाही Oprational Support Payment अदा करेल. जर विकासक कुठलेही सेवा स्तर गरजा पुर्ण करु शकला नाही तर महानगरपालिका संपुर्ण अनिश्चित देयक म्हणजेच रुपये ५० लक्ष जेकी विकासकाला द्यावयाचे आहेत ते स्थगीत करेल.

# परिशिष्ट "ब"

| Concession कालावधी | महानगरपालिकेवर असलेले दायित्व (रु. कोटी मध्ये) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | वार्षीक अनुदान (Annual Grant) | स्वतंत्र अभियंता | स्वतंत्र लेखा परिक्षक | भुसंपादन | एकुण |
| **वर्ष १** | ६३ कोटी | ३.११ | ०.४० | ३०.००[२] | ९६.५१ |
| **वर्ष २** | ६६.७८ कोटी | ३.११ | ०.४० | ०.०० | ७०.२९ |
| **वर्ष ३** | ७०.७९ कोटी | ३.११ | ०.४० | ०.०० | ७४.३० |
| **वर्ष ४** | ७५.०३ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ७६.४२ |
| **वर्ष ५** | ७९.५४ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ८०.९३ |
| **वर्ष ६** | ८४.३१ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ८५.७० |
| **वर्ष ७** | ८९.३७ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ९०.७६ |
| **वर्ष ८** | ९४.७३ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ९६.१२ |
| **वर्ष ९** | १००.४१ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १०१.८० |
| **वर्ष १०** | १०६.४४ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १०७.८७ |
| **वर्ष ११** | ११२.८२ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ११४.२१ |
| **वर्ष १२** | ११९.५९ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १२०.९८ |
| **वर्ष १३** | १२६.७७ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १२८.१६ |
| **वर्ष १४** | १३४.३७ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १३५.७६ |
| **वर्ष १५** | १४२.४४ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १४३.८३ |
| **वर्ष १६** | १५०.९८ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १५२.३७ |
| **वर्ष १७** | १६०.०४ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १६१.४३ |
| **वर्ष १८** | १६९.६४ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १७१.०३ |
| **वर्ष १९** | १७९.८२ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १८१.२१ |
| **वर्ष २०** | १९०.६१ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १९२.०० |
| **एकुण रुपये** | **२३१७.४९ कोटी** | **२६.१६** | **०८.००** | **३०.००** | **२३८१.६५ कोटी** |

# परिशिष्ट "क "

**ग्राहकांची थकबाकी वसुल करण्यासाठी द्यावयाचे प्रोत्साहन पर रक्कम**

| अ.क्र. | थकबाकी वसुलीची टक्केवारी | प्रोत्साहन |
|---|---|---|
| १ | ० - ५० % | १५ % |
| २ | ५० - ७५ % | २० % |
| ३ | ७५ % आणि त्यापेक्षा जास्त | ३० % |

# परिशिष्ट "ड"

**UIDSSMT अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेस करावयाच्या बंधनकारक सुधारणा (Reforms)**

**अ) अनिवार्य सुधारणा.**

- ई - प्रशासन (E- Governance)
- महानगरपालिका लेखे Municipal Accounting / दुहेरी नोंद लेख्रा पद्धत (Accrual Based Double Entry Accounting System)
- मालमत्ता कर (Property Tax)
- सेवा कर (User Charges)
- शहरी गरीबांसाठी सेवा पुरविण्या करीता निधी उभारण्याची अंतर्गत तरतुद
- शहरी गरीबांसाठी मुलभुत सेवा पुरविणे.

**ब) ऐच्छिक सुधारणा**

- बिल्डींग बायलॉज मध्ये मंजुरीच्या प्रणाली नुसार करावयाच्या सुधारणा
- शहरा अंर्तगत भविष्यातील सर्व इमारतींकरीता पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण अनिवार्य करण्या करीता बिल्डींग बायलॉज मध्ये सुधारणा करणे. जेणे करुन जलसंधारण कार्यवाही स्विकारल्या जाईल.
- वापरलेल्या पाण्याचा पुर्नवापर करण्याकरीता बायलॉज
- प्रशासकीय सुधारणा
- संरचनात्मक सुधारणा
- पब्लिक प्राइव्हेट पाटर्नशिप करीता उत्तेजन देणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.रेणुकादास वैद्य :शासनाकडुन मनपास पत्र आलेले आहे त्याबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :पत्र वाचून दाखविण्याचे आदेश देण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. समांतर बाबत शासनाने जे पत्र दिले आहे त्याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :पीपीपीची मंजूरी असतांना शासन पुन्हा पत्र का देण्यात येते.

कार्य.अभियंता(पा.पू.) :दिनांक 18.02.2011 रोजी मा.सचिव, नगर विकास विभाग यांनी दुरध्वनीवरून दिलेल्या सूचनेनुसार मा.आयुक्त, उपअभियंता श्री.फालक,

आणि एजन्सीचे तीन प्रतिनीधी आर्थिक बाबी बघणारे व व्यवस्थापनाचे 3 प्रतिनिधी, क्रिसीलचे प्रतिनिधी पीपीपी मध्ये तज्ञ असलेले व विशेष नियुक्त अधिकारी (OSD) व मी यांची मुंबई येथे विधानभवनाच्या बाजुला सीआर टु बिल्डींगमध्ये बैठक झाली. मा.मनुकुमार श्रीवास्तव यांनी मा.आयुक्तांना दुरध्वनीवरून सूचना दिल्या होत्या की, योजनेला अनुसरून जे पाणी पुरवठ्याबाबत टेंडर प्राप्त झालेले आहे. व लोयस्ट वन जो कंत्राटदार आहे, त्याने एओएसजी (ॲन्युअल ऑपरेशन सपोर्ट ग्रॅन्ट) रक्कम 63 कोटी पहिल्या वर्षाकरीता मागीतलेली आहे. श्री.अजय सक्सेना यांच्याबरोबर बैठक घेऊन श्री.अजय सक्सेना पीपीपी एक्स्पर्ट यांनी सर्व प्रकारची माहिती आमच्याकडुन घेऊन निविदाधारकाकडुन सर्व माहिती घेतली. त्यांनी भरलेले दर कशाप्रकारे भरले याची माहिती घेतली सदर दरामध्ये वाटाघाटी करण्याबाबत प्रशासन स्तरावर प्रयत्न केलेला आहे. दर हे कमी आहे. तथापी निवीदाधारकाने प्रकल्पामध्ये बिझनेस रिस्क जास्त असल्यामुळे दर कमी करणे शक्य नसल्याचे कळवीले आहे. मा.अजय सक्सेना यांनी दोन दिवस विचार करून त्यास सपोर्टेड असलेल्या बाबी लक्षात घेऊन विचार करण्यात यावा. त्याआधारे मा.सभापती महोदयांना पत्र दिलेले आहे. मा.आयुक्तांनी मा.सभापती यांना दिलेले दिनांक 19.02.2011 रोजीचे पत्र पुढील प्रमाणे......

औरंगाबाद शहराची वाढीव पाणी पुरवठा योजना पब्लीक प्राईव्हेट पार्टनरशीप तत्वार राबविण्यात येत असून निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव महानगरपालिका प्रशासनाने आपणाकडे सादर केलेला आहे. दिनांक 21.02.2011 रोजी आयोजित केलेल्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्रमांक 158 नुसार हा प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात आलेला आहे.

मा.प्रधान सचिव-2 नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार दिनांक 18.02.2011 रोजी श्री.अजय सक्सेना, पीपीपी एक्स्पर्ट, महाराष्ट्र शासन यांच्या मुंबई येथील कार्यालयात बैठक संपन्न झाली बैठकीस मा.आयुक्त, क्रिसील संस्थेचे श्री.संतु दिवेकर, युनिटी कन्सलटंटचे श्री.महेश पाठक, श्री.नरेश नानोटकर,एसपीएमएल या निविदाधारकाचे श्री.पंकज टाओया, श्री.मनोज नैनानी, श्री.श्रीरंग देशपांडे आणि संबधीत कार्यकारी अभियंता व उपअभियंता उपस्थित होते. पीपीपी निविदा प्रकरणी एसपीएमएल या कमी दर भरलेल्या एल 1 निविदाधारकाने अन्युअल ऑपरेशन सपोर्ट ग्रॅन्ट म्हणुन पहिल्या वर्षाकरीता रूपये 63 कोटी रक्कम मागीतलेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने सदर दरामध्ये वाटाघाटी करण्याबाबत प्रशासन स्तरावर प्रयत्न केला आहे. तथापि निविदाधारकाने प्रकल्पामध्ये बिझनेस रिस्क जास्त असल्यामुळे दर कमी करणे कश्य नसल्याचे कळविले होते. त्यामुळे प्रशासनातर्फे पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली.

दिनांक 18.02.2011 रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये दर वाटाघाटी बाबत चर्चा झाली बैठकीमध्ये झालेल्या चेर्चेनुसार सविस्तर माहिती मा.प्रशान

सचिव-2 नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना देण्यात आली असुन सध्या शासन स्तरावरून दर कमी करण्याबाबत प्रयत्न सुरू आहेत. या प्रकरणी निविदाधारकाने मागीतलेली एओएसजीची रक्कम कमी झाल्यास महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होऊ शकतो. बैठकीत झालेल्या चर्चे संदर्भाने माहिती कार्यकारी अभियंता यांनी आपणांस दिनांक 18.02.2011 रोजी व आज दिनांक 19.02.2011 रोजी भ्रमणध्वनीवरून अवगत केली आहे.

करीता कृपया सोमवार दिनांक 21.02.2011 रोजी आयोजित केलेल्या स्थायी समिती बैठकीतील विषय क्रमांक 158 अन्वये समांतर पाणी पुरवठा योजनोचा निविदा मंजुरीचा प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवावा हि विनंती. आपला, आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद.

श्री.रेणुकादास वैद्य :शासनास विनंती करण्यात यावी व लवकरात लवकर सदरचा विषय सभागृहापुढे चर्चेकरीता आणुन योजना अस्तित्वात आणण्याकरीता प्रयत्न करावा.

श्री.विकास जैन :प्रशासनाने कंन्सलटंट नेमलेले आहे त्यांचे मत काय आहे. किती रक्कम देणार आहे.

कार्य.अभियंता(पा.पू.) :या संदर्भांत पीसीएमएलची भारत सरकारने नेमणुक केलेली आहे. डिपार्टमेंट ऑफ इकोनॉमिकल अफेअररर्स आणि एशियन डेव्हलपमेंट बँकेने आपल्याला 1.20 कोटी दिलेले आहे. या प्रकल्पाला आकार येण्यासाठी मार्गदर्शन घेण्यासाठी क्रिसीलची नेमणुक केलेली आहे. 63 कोटी संदर्भांत सुरूवातीस आक्षेप घेतले होते. परंतु बेसीक ज्या गोष्टी घेतलेल्या होत्या व संबधीत कंत्राटदाराबरोबर चर्चा झाल्यानंतर ही रक्कम बरोबर असल्याचे मत झाले आहे. महानगरपालिकेच्या स्तरावर रक्कम कमी करण्याचे सर्व प्रयत्न केलेले आहे. शासनस्तरावर रक्कम कमी करण्यासाठी Negotiation होणार आहे.

श्री.मधुकर सावंत :सोमवारपर्यंत विषय मार्गी लावण्यात यावा.

मा.सभापती :विषय क्रमांक 158 बाबत मागील बैठकीतही मा.आयुक्त नसल्याने पुढे ढकलण्यात आला होता. मा.आयुक्तांनी पत्र देऊन विषयास स्थगीत देण्याची विनंती केलेली आहे. औरंगाबाद शहराची पाण्याची नियोजन व संकलन करून सन 2005-06मध्ये 367 कोटींचा प्रस्ताव शासनासमोर सादर केला होता व मंजूरी प्राप्त झाली होती. परंतु मध्यतंरी या योजनेची किंमत 511 कोटी झाली होती व आता 792 कोटींची योजना झालेली आहे. त्यामुळे जास्त विलंब न करता लवकरात लवकर Negotiation करून मनपाचे हित कसे साध्य होईल हे प्रयत्न करून प्रश्न मार्गी लावण्यात यावे. जवळपास 6 वर्ष योजनेला मंजूरी मिळालेली आहे. शासनाचे प्रतिनिधी आणि या योजनेचे कंत्राटदार यांचेशी वाटाघाटी करून 24 तास पाणी कसे मिळेल हया बाबी लक्षात घेऊन स्थायी समितीसमोर प्रस्ताव लवकरात लवकर ठेवण्यात यावा. विषय पाच ते सहा दिवसांसाठी स्थगीत करण्यात येतो.

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थगित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

ऐनवेळेचे विषय

**विषय क्र. 159 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.13, विश्वासनगर मधील प्रोफेसर कॉलनी, एस.बी.एच. कॉलनी, फाजलपुरा व विविध ठिकाणी रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याचे सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.19,99,588/- होत आहे. सदरील कामासाठी सन 2010-11 च्या अर्थसंकल्पात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्ष अंतर्गत तरतुद उपलब्ध आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.111, दिनांक 12/01/2011 अन्वये अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झाल्यानुसार या कामाच्या निविदा इ निविदा विभागामार्फत मागविल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. मे.रे इंजिनिअरींग, औरंगाबाद 27% जास्त दर.
2. मे.श्रीजीत एस.कडपुरम्बील 29% जास्त दर.
3. मे.राजेश्वर कन्स्ट्रक्शन 45.5% जास्त दर.

वरीलपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27% जास्त दर मे.रे इंजिनिअरींग,औरंगाबाद यांचे आहेत. परंतु अंदाजपत्रकीय दराने मान्यतेची शिफारस केल्यानुसार आणि त्यास मा.आयुक्त यांची दिनांक 04/02/2011 रोजी मान्यता झाल्यानुसार मे.रे इंजिनिअरींग यांचेकडून काम करून घेणेस मे.रे इंजिनिअरींग, औरंगाबाद यांची निविदा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : ऐनवेळचे विषय मंजूर करण्यात यावे.
मा.सभापती : ऐनवेळच्या विषयांना मंजुरी देण्यांत येते.
श्री.अ.साजेद अ.सत्तार :विषय मंजूर करण्यात यावे.
मा.सभापती :मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.13, विश्वासनगर मधील प्रोफेसर कॉलनी, एस.बी.एच. कॉलनी, फाजलपुरा व विविध ठिकाणी रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.रे इंजिनिअरींग,औरंगाबाद यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 160 :**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.09 अंतर्गत वसुंधरा कॉलनी व संगीता कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन 2010-11 ची दरसुची (DSR) नुसार तयार करण्यात आले असून अं.प.र.रू.17.00 लक्ष आहे. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रं.197, दिनांक 18/01/2011 अन्वये या कामासाठी पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षा खालील एकत्रित तरतुद र.रू.17.00 लक्ष उपलब्ध करण्यात आली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव स्थायी समिती सभेसमोर सादर करणेसाठी मा.आयुक्त महोदयांची दिनांक 04/02/2011 रोजी मान्यता प्राप्त आहे. अंदाजपत्रक र.रू.17.00 लक्ष मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.09 अंतर्गत वसुंधरा कॉलनी व संगीता कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे तयार करण्यांत आलेल्या र.रू.17.00 लक्षच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 161 :**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.09 अंतर्गत नंदनवन कॉलनी येथील विविध ठिकाणी डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन 2010-11 ची दरसुची (DSR) नुसार तयार करण्यात आले असून अं.प.र.रू.12,99,169/- आहे. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रं.197, दिनांक 18/01/2011 नुसार सदर कामास र.रू.13 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव स्थायी समिती सभेसमोर सादर करणेसाठी मा.आयुक्त महोदयांची दिनांक 04/02/2011 रोजी मान्यता प्राप्त आहे. अंदाजपत्रक र.रू.12,99,169/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.09 अंतर्गत नंदनवन कॉलनी येथील विविध ठिकाणी डांबरीकरण करणेच्या कामाचे तयार करण्यांत आलेल्या र.रू.12,99,169/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 162 :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहराच्या ज्या भागात जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा होत नाही, अशा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे वॉटर टँकर कमी पडत असल्यामूळे भाडे तत्वावर खाजगी टँकर लावण्यासाठी रक्कम रू.87.30 लक्षचे अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले होते. दिनांक 18/09/2010 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.94 दिनांक 18/09/2010 अन्वये प्रत्यक्षात रूपये 30.00 लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली असल्यामूळे रक्कम रूपये 30.00 लक्षच्या कामासाठी मान्यता प्रदान केली आहे. त्याच बरोबर खाजगी टँकर एक वर्षासाठी भाडे तत्वावर लावण्याकरीता व त्यापोटी येणाऱ्या एकूण संभाव्य खर्चास मंजुरी देण्यात आलेली आहे.

भाडेतत्वावरील वॉटर टँकरचे दर निश्चीत करून वार्षिक करार करण्याच्या कामासाठी ई-निविदेद्वारे निविदा कार्यवाही केली असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | ठेकेदार | क्षमता | प्राप्त दर | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रतिदिन | प्रति कि.मी. |
| 1. | मे.अमुल लॉरी सर्व्हीसेस, औरंगाबाद | 5000 लि. | 1280/- (fix) | 14=75 |
| | | 10000 लि. | 1680/- (fix) | 21=25 |
| 2. | मे.गुरूदत्त ट्रान्सपोर्ट, औरंगाबाद | 5000 लि. | 1375/- (fix) | 16=50 |
| | | 10000 लि. | 1850/- (fix) | 25=00 |

तुलनात्मकदृष्ट्या मे.अमुल लॉरी सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचे दर 5000 लिटर व 10000 लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टँकर करीता प्रतिदिन व प्रति किलोमिटर दर सर्वात कमी आहेत. तथापी मे.अमुल लॉरी सर्व्हीसेस औरंगाबाद यांचेशी दर कमी करण्याबाबत वाटाघाटी केली असता वाटाघाटीअंती खालीलप्रमाणे दर कमी करण्यात आले.

| अ.क्र. | ठेकेदार | क्षमता | प्राप्त दर | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रतिदिन | प्रति कि.मी. |
| 1. | मे.अमुल लॉरी सर्व्हीसेस, औरंगाबाद | 5000 लि. | 1180/- (fix) | 14=25 |
| | | 10000 लि. | 1600/- (fix) | 20=25 |

उपरोक्त कमी केलेल्या दरास मा.आयुक्त महोदय यांनी मंजूरी देऊन प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर करण्याची शिफारस केली आहे. तरी मे.अमोल लॉरी सर्व्हीसेस, औरंगाबाद यांच्या दरास मान्यता मिळणेस्तव तसेच आवश्यकते प्रमाणे खाजगी टँकर एक वर्षासाठी भाडे तत्वावर लावण्याकरीता आणि त्यापोटी होणाऱ्या एकूण संभाव्य खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहराच्या ज्या भागात जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा होत नाही, अशा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे वॉटर टँकर कमी पडत असल्यामूळे भाडे तत्वावर खाजगी टँकर लावण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.94 दिनांक 18/09/2010 अन्वये करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 30.00 लक्षच्या कामासाठी प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराच्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार मे.अमोल लॉरी सर्व्हीसेस, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे व आवश्यकते प्रमाणे खाजगी टँकर एक वर्षासाठी भाडे तत्वावर लावण्याकरीता आणि त्यापोटी होणाऱ्या एकूण संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | ठेकेदार | क्षमता | प्राप्त दर | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रतिदिन | प्रति कि.मी. |
| 1. | मे.अमुल लॉरी सर्व्हीसेस, औरंगाबाद | 5000 लि. | 1180/- (fix) | 14=25 |
| | | 10000 लि. | 1600/- (fix) | 20=25 |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.अमित भुईगळ :सलिम अलि सरोवर येथे अतिक्रमण होत आहे प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी सलिम अलि सरोवर येथे जाऊन प्रत्यक्ष पहाणी करून होत असलेले अतिक्रमण काढुन टाकण्यात यावे व माहिती देण्यात यावी.

श्री.अमित भुईगळ :सिटी सर्वे नंबर 14854 येथे 23 रो हाऊस तयार झालेले आहे. स.सदस्य श्री.मिलिंद दाभाडे यांनी प्रशासनास वेळोवेळी माहिती दिलेली आहे परंतु कार्यवाही झालेली नाही. 31 डिसेंबर रोजी मा. आयुक्तांनी संबधीत इमारत पाडण्याचे आदेश दिलेले आहेत. टेहरे पाटील यांची शाळाही त्या ठिकाणी बांधलेली आहे.

उपआयुक्त(सिडको) : रमानगर येथे कलम 260,478 ची नोटीस दिली होती. त्यांनी मा.न्यायालयात चॅलेंज केले होते. या संदर्भात विधी विभागाचा अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल. मा.आयुक्तांचे आदेश झाल्यानंतर नोटीस दिलेली आहे. त्या नोटीसला चॅलेंज केलेले आहे.

मा.सभापती :मा.न्यायालयाचे काय आदेश आहेत.

विधी सहाय्यक :मा.न्यायालयाचा कुठलाही मनाई हुकूम नाही.

मा.सभापती : कोणताही मनाई हुकूम नाहीतर ताबडतोब व्हावे.

उपआयुक्त(सिडको) :निष्कासीत करण्यासाठी पोलिस बंदोबस्तासाठी पत्र पाठवून पाठपुरावा करण्यांत येईल.

श्री.अमित भुईगळ :तात्काळ काढण्याचे आदेश द्यावेत.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :रोशन गेट येथे दोन वर्षापासून पोलीस बंदोबस्त मिळत नाही.

मा.सभापती :संबधीत अतिक्रमण पाडण्यासाठी पत्रव्यवहार न करता संबधीत अधिकारी यांनी स्वतः जाऊन पोलिस खात्यातील अधिकाऱ्यांना विनंती करुन पोलिस बंदोबस्त मिळवुन अतिक्रमण पाडण्यात यावे.

श्री.सुर्यकांत जायभाये : डास निर्मुलनासाठी ॲबेट औषधाची फवारणी केली जाते. सदरील औषध शासनाकडुन मनपास मोफत मिळत असे. सिडको हडकोचे हस्तांतरणापुर्वी सिडको हडकोमध्ये खाजगी ठेकेदाराकडुन फवारणीचे कामे होत होती. सिडको मनपामध्ये विलीन झाले त्यावेळी शासनाकडुन औषध मिळत असतांना ठेकेदाराकडुन निवीदा काढण्यात आल्या त्यात लाखो रूपये खर्च होत आहे. याबाबतीत आरोग्य विभागाकडून माहीती घेतली असता महाराष्ट्र शासनाने सांगीतले की, शासन औषध पुरवठा करू शकत नाही. मनपाने स्वतःच्या पैशातुन औषध खरेदी करावे. गेल्या सहा महीन्यात सहा लाखाचे औषध खरेदी केले 963 लिटर औषध 77 वार्डात वर्षभर पुरवठा झालेला आहे. साधारणतः बारा ते पंधरा हजार रूपये प्रत्येक वार्डाला खर्च येतो. 100 वार्डाचा विचार केला तर साधारणतः बारा लाख रूपये खर्च येईल. असे असतांना सिडकोतील 22 वार्डासाठी सहा ठेकेदार नेमुन त्यांना दरवर्षी औषधासाठी 50 लाख रूपये देण्यात येतात. खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

आरोग्य वैद्य. अधिकारी :सिडको भागात औषधाची फवारणी करण्यात येते ती सिडको काळापासून चालत आलेली आहे. ते तसेच टेंडर चालत राहीलेले आहे. सिडको हस्तांतरणापुर्वी सिडकोच्या मानांकनानुसार किती औषध/किती मजूर लागणार आहे हे ठरविण्यात आले. त्या गोष्टी आत्तापर्यंत फॉलो करण्यात आल्या. शासनस्तरावर औषधी मिळत होते. त्यामुळे किती खर्च करतो ई. गोष्टींवर विचार केला नाही. यावर्षी ज्यावेळी खरेदी केले त्यावेळी लक्षात आले की, इतर वार्डाच्या तुलनेत 22 वार्डावर एवढा जास्त खर्च करतो. आता जुने टेंडर संपत आलेले आहे. नविन टेंडर काढतांना ही काळजी घेणार आहे. मनपा त्यांना औषधी देणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :लाखो रूपयांचे नुकसान होत आहे. प्रशासनाचे हे उत्तर योग्य नाही. संबधीत ठेकेदाराची कमी रेटमध्ये काम करण्याची तयारी असेल तर काम देण्यात यावे. नसता नव्याने टेंडर काढण्यात यावे.

श्री.जायभाये :गेल्या तीन वर्षात शासनाकडुन औषधी मिळत असतांना 46 लाख रूपये का देण्यात आले. चौकशी करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :चौकशी करण्यात यावी.

श्री.सुर्यकांत जायभाये :31 डिसेंबरला निवीदा संपल्यानंतर कुठल्या आधारे निवीदा चालू आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रक्रीयेला सुरवात केली पाहीजे होती.

आरोग्य वैद्य. अधिकारी :31 डिसेंबरला मुदत संपलेली आहे. निवीदेची प्रक्रीया सुरू केलेली आहे. त्यास मान्यता आलेली आहे.

श्री.विकास जैन :31 डिसेंबर नंतरचे पेमेंट देण्यात येऊ नये. चौकशी करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :मनपा ही सेवाभावी संस्था आहे.

श्री.सुर्यकांत जायभाये :एक्सटेंन्शन देत असतांना कुठलीही परवानगी घेतलेली नाही.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:मा.आयुक्तांची मान्यता घेतलेली आहे.

मा.सभापती :महानगपालिकेत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे लाखो रूपयांचे नुकसान झालेले आहे. निवीदेची मुदत संपल्यानंतरही कॉन्ट्रॅक्ट चालू आहे कुठलीही कार्यवाही केलेली नाही. सिडकोतील औषध फवारणी बाबतचा खर्च इतर भागातील औषध फवारणीच्या खर्चाच्या तुलनेत जास्त होत आहे. 31 डिसेंबर नंतरचे देयक संबधीताला अदा करू नये. याबाबत मुख्य लेखापरिक्षक यांनी चौकशी करून स्थायी समितीकडे अहवाल सादर करावा. विषयास कार्योत्तर मंजूरी मिळेल असे गृहीत धरून कुठलेही कार्य करून नये. कार्योत्तर मंजूरी रद्द होऊ शकते.

श्री.रेणुकादास वैद्य :बेटरमेंट चार्जेस संदर्भातील प्रकरण मा.न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे यावर चर्चा करू नये म्हणुन सर्वसाधारण सभेत सांगण्यात आले. त्यामुळे या विषयास स्थायी समितीमध्ये चर्चा करू शकतो काय याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

सहाय्यक विधी सल्लागार:सदरील विषय जो चर्चेला आलेला आहे त्या संदर्भात जो विषय न्यायप्रविष्ट आहे. मुंबई प्रांतिक महानगरपलिका अधिनियम 1949 चे अनुसूचिचे प्रकरण ड मधील सभा कामकाज नियम 5 मध्ये उल्लेख आहे. भारतामधल्या कुठल्याही न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट असेल तर त्या संदर्भाने प्रश्न उपस्थित करू नये. असा स्पष्ट उल्लेख आहे.

मा.सभापती :मुदतवाढीसाठी मा.न्यायालयात गेलेला आहे. मा.न्यायालयाचा आधार घेऊन विषय टाळण्याचा प्रयत्न करू नये. जी कुणी व्यक्ती महानगरपालिकेच्या विरोधात मा.न्यायालयात गेलेली आहे. ती व्यक्ती कोण आहे. सदरील प्रकरणाची स्थिती काय आहे.

सहाय्यक विधी सल्लागार:मा.न्यायालयाचे या प्रकरणात अजुन काही आदेश दिलेले नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :वकीला मार्फत मा.न्यायालयाला विचारले पाहीजे की, स.नगरसेवकांना चर्चा करायची आहे मा.न्यायालयाची काही हरकत आहे काय?

सहाय्यक विधी सल्लागार:मा.न्यायालयास याबाबतीत विनंतीनुसार विचारणा करण्यात येईल.

मा.सभापती :मुदतवाढीला स्थगीती दिलेली आहे काय? मॅटर अजुन चालू झालेले नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :नियम वाचून दाखविण्यात यावे.

सहाय्यक विधी सल्लागार: प्रश्न विचारण्याचा हक्क

1) पुढील शर्तीच्या अधीन राहून पालिका सदस्य या अधिनियमाची अंमलबजावणी किंवा शहराचे नगरपालिका शासन यासंबंधी किंवा त्याच्याशी संबंधित असलेले कोणतेही प्रश्न विचारता येतील.

अ)प्रश्न विनिर्दिष्ट करणारी सात पूर्ण दिवसांची लेखी नोटीस नगरपालिका सचिवास देण्यात आली पाहीजे

ब) पुढील प्रकारचा कोणताही प्रश्न विचारता कामा नये

(एक) ज्यात मत व्यक्त करण्याविषयी किंवा तात्विक कायदेविषयक प्रश्नावर निर्णय देण्याविषयी मागणी करण्यात आली असेल किंवा जो गृहित गोष्टींच्या अनुषंगाने असेल असा कोणताही प्रश्न.

(दोन) जो प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, भारताच्या प्रदेशातील कोणत्याही भागातील कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणापुढे प्रलंबित असलेला कोणताही वाद किंवा कार्यवाही यासंबंधी किंवा त्याच्याशी संबंधित असेल असा कोणताही प्रश्न.

मा.सभापती :प्रकरण दाखल झालेले आहे का? तसे मनपास कळविण्यांत आलेले आहे काय?

सहाय्यक विधी सल्लागार: प्रकरण दाखल झालेले आहे. प्रत मिळालेली आहे. 25 तारखेला प्रकरण ठेवण्यात आलेले आहे.

मा.सभापती : टेटेस्को असतांना देखील एका व्यक्तीस कंम्पलिशन सर्टिफिकेट दिलेले आहे. मा.आयुक्तांच्या स्वाक्षरीने देण्यात आलेले आहे. हे कितपत योग्य आहे.

सहाय्यक विधी सल्लागार:सदरील विषय माझ्या विभागाशी संबधीत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :25 तारखेला प्रकरण बोर्डावर ठेवण्यात आलेले आहे. चांगल्या विधी तज्ञांची नियुक्ती करण्यात यावी.

मा.सभापती :सदर प्रकरणात चांगल्या विधीतज्ञाची नियुक्ती करण्यात यावी.

श्री.जगदिश सिध्द :कलकत्ता उच्च न्यायालयात एका प्रकरणात मनपाच्या वतीने कुणी वकील हजर नव्हता.

श्री.सुर्यकांत जायभाये :वर्तमानपत्रात जकात बंद करण्याविषयीच्या बातम्या प्रकाशित होत आहे. उपकर लावण्याची प्रक्रीया चालू आहे. जकात बंद झाल्यास उत्पन्नाचे स्त्रोत कुठले असणार आहे याबाबतचा खुलासा व्हावा.

मा.सभापती :या संदर्भात विशेष सर्वसाधारण सभा लावावी लागेल.

श्री.रेणुकादास वैद्य :महानगरपालिकेत जकात चालूच राहिली पाहीजे. प्रशासनाच्या वतीने राज्य शासनाकडे याबाबतीतचे निवेदन झालेले आहे. पदाधिकाऱ्यांच्या मार्फत संस्थेच्या शहराच्या हिताचे होईल त्यामुळे राज्य शासनाकडे निवेदन करावे

मा.सभापती :या संदर्भात स्वतंत्र अशी सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात येईल.

याच बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद